
दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे | अंक –३५४ | बुधवार,दि.२७ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-354 | Wednesday, Dt.27 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4





# लातुरात तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

## मराठा आरक्षणाची ठिणगी पेटणार सरकारच्या वेळकाढूपणामुळे विष प्राशन केल्याची चिठ्ठी

लातूर : मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगेसह लाखो मराठे बांधव बुधवारी मुंबईकडे कूच करत असतानाच लातूरमध्ये एक धक्कादायक घटना घडली. मराठा आरक्षणाच्या विषयावर सरकार वेळकाढूपणा करते, जरांगेंना वारंवार उपोषण करायला भाग पाडतेय असा आरोप करत एका तरुणाने विष प्राशन केले. सुदैवाने या तरुणाचा जीव वाचला असून त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बळीराम मुळे (वय ३५) असं या युवकाचे नाव आहे.

मराठा आरक्षणासाठी मराठवाड्यात चलो मुंबई अशी घोषणा देत मुंबईकडे कूच करण्यात येणार आहे. या मुद्यावरून राज्यभर वातावरण अधिकच तापल्याचे दिसत आहे. त्याचवेळी अहमदपूर तालुक्यातील शिंदगी बुद्रुक येथील बळीराम मुळे या युवकाने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. सरकार मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर वारंवार वेळकाढूपणा करत आहे, मनोज जरांगे यांना वारंवार उपोषणाची वेळ आणली जात आहे अशा शब्दांत त्याने चिठ्ठी खिशात ठेवली आणि नंतर विष प्राशन केले. बळीराम मुळे याच्यावर लातूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.बळीराम मुळे याचे लग्न झालेले असून दोन मुली आहेत. भावासोबत दहा एकर कोरडवाहू शेती तो कसत आहे. काही दिवसांपासून तो मुंबईला आंदोलनासाठी जाण्याची तयारी करत होता. मंगळवारी सायंकाळी शेतात जाऊन त्याने हे टोकाचे पाऊल उचलले. घटनेची माहिती मिळताच नातेवाईक आणि मित्रपरिवाराने त्याला तात्काळ लातूर येथील कवठाळे हॉस्पिटलमध्ये दाखल केले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

मनोज जरांगे यांनी दिलेल्या 'चलो मुंबई' च्या हाकेला प्रतिसाद देत राज्यभरातून मराठा समाज मोठ्या संख्येने आंदोलनासाठी मुंबईकडे निघण्याच्या तयारीत आहे. त्याचवेळी अशा काही घटनेमुळे समाजात एकाचवेळी हळहळ आणि सरकार विरोधात संताप व्यक्त होत आहे.



### लातूरमध्ये मोर्चासाठी सर्व तयारी पूर्ण

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी महाराष्ट्रभर पुन्हा आंदोलनाची लाट उसळली असून लातूर जिल्ह्यातूनही त्याला मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. गावागावातील मराठा समाजबांधव मोठ्या संख्येने बुधवारी मुंबईकडे रवाना होणार आहेत. प्रवासादरम्यान तसेच रोजच्या आहारासाठी समाज बांधवांकडून चिवडा, बुंदी, लाडू यासह अन्नधान्याचा साठा करून ठेवण्यात आला आहे.

## मनोज जरांगेंना धक्का; आझाद मैदानात उपोषण करण्यास हायकोर्टाची मनाई

मुंबई: मराठा आरक्षणप्रश्नी मनोज जरांगे पाटील यांना आझाद मैदान येथे आंदोलन करण्यास मुंबई हायकोर्टाकडून मनाई करण्यात आली आहे. नवी मुंबईत खारघर किंवा अन्यत्र परवानगी देण्याची राज्य सरकारला मुभा असेल, असे मुंबई हायकोर्टाचे एका जनहित याचिकेवरील सुनावणीदरम्यान निर्देश दिले आहेत. मुंबईतील रहदारी विस्कळीत होऊ नये, यादृष्टीने मुंबईतील आंदोलनाला परवानगी देऊ नये, असे निर्देश हायकोर्टाकडून देण्यात आले आहेत. त्यामुळे मनोज जरांगे यांची डोकेदुखी वाढली असून ते पुढे काय भूमिका घेतात, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.मनोज जरांगे पाटील यांनी गणेशोत्सव काळात मुंबईत उपोषणाला येणं टाळावं, अशी विनंती करण्यासाठी आज सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी राजेंद्र साबळे हे अंतरवाली सराटी इथं दाखल झाले होते. राजेंद्र साबळे यांनी मनोज जरांगे यांच्यासोबत याबाबत चर्चाही केली. मात्र मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळाल्याशिवाय आता माघार घेणार नाही, अशी ठाम भूमिका या भेटीनंतर जरांगेंनी मांडली.

आम्ही मुंबईला निघण्याआधी सरकारने आरक्षणाबाबत निर्णय घ्यावा, तरंच आम्ही माघार घेऊ, असं जरांगे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटलं होतं. परंतु आता हायकोर्टानेच मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करण्यास मनाई केल्याने मनोज जरांगेंची कोंडी होणार आहे.

## मराठा आरक्षणासाठी मोठ्या संख्येने मुंबईला चला–आ.संदीप क्षीरसागर

### वाढदिवस साजरा न करण्याचे आ.क्षीरसागरांकडून आवाहन

बीड (प्रतिनिधी)

संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली, मराठा आरक्षणासाठी होत असलेल्या अंतिम आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर माझा वाढदिवस साजरा न करता आंदोलनात सहभागी होण्यासाठी मोठ्या संख्येने मुंबईला चला, याच माझ्यासाठी वाढदिवसाच्या शुभेच्छा असतील. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



२७ ऑगस्ट रोजी आ.संदीप क्षीरसागर यांचा वाढदिवस आहे. त्यांचा वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम आणि कार्यक्रम घेऊन कार्यकर्ते वाढदिवस साजरा करत असतात. परंतु यावर्षी मराठा समाजाला आरक्षण मिळविण्यासाठीची ही शेवटची लढाई आहे. त्यामुळे माझा वाढदिवस साजरा न करता, सध्या संपूर्ण लक्ष आंदोलनावर ठेवून त्यासाठी जोमाने परिपूर्ण तयारी करा आणि संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथे होत असलेल्या ऐतिहासिक आंदोलनास बहुसंख्येने, एकजूटीने मुंबईला चला. याच माझ्या वाढदिवसाच्या मला शुभेच्छा असतील. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या पाठपुराव्याला यश - बीड जिल्ह्यातील दोन मोठ्या कामांना मंत्रिमंडळाची मंजुरी

### सिंदफणा नदीवरील तीन बंधाऱ्यांचा होणार विस्तार व बॅरेजमध्ये रुपांतर ; आष्टीत नवीन दिवाणी न्यायालय स्थापनेचाही मार्ग मोकळा

मुंबई (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यासाठी आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असुन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत जलसंपदा व विधी विभागांतर्गत बीडसाठी दोन मोठ्या निर्णयांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये सिंदफणा नदीवरील तीन बंधाऱ्यांचा विस्तार व बॅरेजमध्ये रुपांतर होणार आहे.तर आष्टी येथे नवीन दिवाणी न्यायालयाची स्थापना होणार आहे.



सिंदफणा नदीवरील तीन बंधाऱ्यांचा विस्तार व बॅरेजमध्ये रुपांतर याबाबतच्या जलसंपदा विभागाच्या प्रस्तावाला मान्यता देत, बीड जिल्ह्यातील शिरूर (कासार) तालुक्यातील निमगाव व ब्रम्हनाथ येळंब आणि गेवराई तालुक्यातील टाकळगाव (हिंगणी) येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचा विस्तार करण्यास तसेच त्यांचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याचा निर्णय मंत्रीमंडळ घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे पाणीसाठवण क्षमता वाढून शेतीसाठी पाणी उपलब्ध होणार असून, स्थानिक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच

आष्टी येथे नवीन दिवाणी न्यायालयाची स्थापना याबाबत विधी व न्याय विभागाच्या प्रस्तावासही मान्यता देण्यात

(उर्वरीत पान २ वर)

## धनंजय मुंडेंच्या नाथ प्रतिष्ठान कडून साध्या पद्धतीने होणार श्री वैद्यनाथ सार्वजनिक गणेशोत्सव साजरा

### ज्येष्ठ व्यापारी बंडू गरड यांच्या हस्ते सपत्नीक पूजन करून होणार होणार श्रींची स्थापना

परळी (प्रतिनिधी) – माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने मागील वीस वर्षांपासून दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या श्री वैद्यनाथ सार्वजनिक गणेशोत्सवाचे यावर्षी शेतकरी बांधवांवर ओढवलेल्या संकटाच्या पार्श्भूमीवर अत्यंत साध्या पद्धतीने आयोजन करण्यात येणार असून, उद्या दुपारी १२.३० वाजता परळी वैद्यनाथ शहरातील ज्येष्ठ व्यापारी बंडू गरड यांच्या हस्ते सपत्नीक विधिवत पूजन करून मोंढा परिसरात उभारलेल्या मंडपात श्रींची विधिवत स्थापना करण्यात येणार आहे.

नाथ प्रतिष्ठान आयोजित श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवास राष्ट्रीय पातळीवरील सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांची परंपरा आहे, मात्र यावर्षी संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी संजीवन सोहळ्याच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या संजीवन समाधी सोहळ्याचा देखावा तसेच चांगदेव – मुक्ताई भेट, पैठण धर्मसभा असे अत्यंत आकर्षक देखावे साकारण्यात येत असून या देखाव्याचे माजी मंत्री आमदार तथा नाथ प्रतिष्ठान चे अध्यक्ष धनंजय मुंडे यांच्या हस्ते उद्या सायंकाळी ७ वाजता उद्घाटन करण्यात येणार आहे.

श्री गणेश स्थापना तसेच देखावा उद्घाटन समारंभास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नाथ प्रतिष्ठान चे सर्व सदस्य, तसेच श्री गणेश भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन नाथ प्रतिष्ठान च्या वतीने करण्यात आले आहे.





माजलगाव – महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने समर्थ राजयोग वृत्तपत्र समुहाचा बाळशास्त्री जांभेकर आदर्श शिक्षक पुरस्कार प्रा.सुदर्शन स्वामी यांना माजलगाव तालुक्यातून जाहीर झाल्याबद्दल सन्मान करताना प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया,सुभाष नाकलगावकर , रविंद्र राऊत, संतोषकुमार जेथलिया, राज गायकवाड, भगीरथ तोडकरी.



माजलगाव – महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने संपादक सुभाष नाकलगावकर यांचा 'उपेक्षितांचा महासंगर' या वृत्तपत्राच्या शुभारंभानिमित्त सन्मान करताना प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, प्रा.सुदर्शन स्वामी, रविंद्र राऊत, संतोषकुमार जेथलिया तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया, भगीरथ तोडकरी.

## छत्रपती शिवाजी नगरचा महाराजा या वर्षी १७ फुटांचा

बीड (प्रतिनिधी)

गेल्या कित्येक वर्षांपासून शिवराजे मित्रमंडळाचे तरुण बीड शहरात वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करून आपल्या कार्याचा ठसा शहरभर निर्माण करत असतात.याच कार्यक्रमांपैकी एक म्हणजे गणेशोत्सव नेहमीच ऐतिहासिक पद्धतीने पार पडणारा गणेशोत्सव या वर्षी अवाढव्य स्वरूपात पूर्ण बीड जिल्ह्याला पहायला मिळणार आहे.

बीड शहरात यंदाच्या गणेशोत्सवात उत्साहाचा नवा आयाम पाहायला मिळणार आहे.



कारण प्रथमच तेलंगणा राज्यातून तब्बल १७ फुटांची बप्पाची भव्य

(उर्वरीत पान २ वर)

## जालना जिल्हा वाहतूक शाखेच्या विशेष मोहिमे दरम्यान कोयता जप्त

### एकावर गुन्हा दाखल,चोरीच्या दुचाकीसह एक संशयित अटक

जालना (प्रतिनिधी)

जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेदरम्यान दोन गंभीर प्रकार समोर आले असून, एका प्रकरणात कारमध्ये बेकायदेशीररित्या लोखंडी कोयता बाळगणाऱ्या इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तर दुसऱ्या प्रकरणात एक संशयित चोरीची मोटारसायकलसह ताब्यात



घेण्यात आला आहे.

दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ६.३० वाजेच्या दरम्यान, तालुका जालना पोलीस ठाण्याच्या समोर जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने मोटार वाहन कायद्यांतर्गत प्रलंबित ई–चलन दंड वसुली व वाहन तपासणीसाठी विशेष मोहीम

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

# मराठा आरक्षणाच्या निर्णायक लढाईत मोठ्या संख्येने सहभागी व्हा - गणेश बजगुडे पाटील

बीड (प्रतिनिधी)

गेली अनेक वर्षांपासुनचा मराठा आरक्षणाचा लढा आज निर्णायक टप्प्यावर पोहचलेला असुन मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी लाखो मराठा बांधव मराठा आरक्षणाच्या या ऐतिहासिक लढाईत सहभागी होणार असुन आपण देखील मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बीड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष तथा शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे.



मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मागील दोन वर्षांपासुन मराठा आरक्षणाची लढाई अधिक तीव्र झालेली असुन गेली चाळीस वर्षापासुनचा हा लढा आज शेवटच्या टप्प्यात असुन २९ ऑगस्ट रोजी लाखो मराठे राज्याच्या राजधानीत धडकणार असुन आरक्षण घेतल्याशिवाय आता मुंबई सोडायची नाही असा ठोस निर्णय करुन आता नाही तर कधीच नाही याप्रमाणे आपण सर्व मोठ्या ताकतीने या आरक्षणाच्या ऐतिहासिक लढाईचे साक्षीदार होऊया. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळेच अनेक मराठा बांधव आज ओबीसी प्रवर्गात आलेले आहेत. आपल्या कुणबी असल्याच्या नोंदी असुन देखील आपल्याला आरक्षणाचा लाभ मिळत नव्हता आज काही प्रमाण जरी मराठा समाजाच्या कुणबी नोंदी मिळालेल्या असल्या तरी सगे सोयरे व मराठवाडा गॅजेट ची अंमलबजावणी करुन मराठा कुणबी, कुणबी मराठा एकच असुन सर्व मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करावा यासाठीची ही निर्णायक लढाई असुन सर्व मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने या लढाईत सहभागी होण्याचे आवाहन शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे.

---

## संपादकीय

# सूर्यावर वादळवारे होतात का?

सूर्यावर हायड्रोजन व हेलियममध्ये सतत रासायनिक प्रक्रिया होत असल्यामुळे त्या प्रक्रियांमध्ये प्रचंड प्रमाणात उष्णता निर्माण होते. त्यामुळे सूर्यावर सतत स्फोट होत असतात. सूर्यावरील या स्फोटांमुळे निर्माण होणाऱ्या वाऱ्यांना सौरवारे किंवा सौरवात असे म्हणतात.

सुभाष आता आदित्यच्या समूहाचा एक सदस्य मित्र बनला होता. आदित्य व त्याच्या मित्रांनासुद्धा सुभाषची मैत्री आवडत होती कारण त्यांना त्याच्याकडून रोज मधल्या सुट्टीत सूर्याबद्दलचे ज्ञान मिळत होते. आपल्या पृथ्वीवर जसे वादळवारे होत असतात तसे सूर्यावरसुद्धा होतात का गड्या? मोन्टूने प्रश्न केला. सुभाष म्हणाला, सूर्यावर हायड्रोजन व हेलियममध्ये सतत रासायनिक प्रक्रिया होत असतात व त्या प्रक्रियांमध्ये प्रचंड प्रमाणात उष्णता निर्माण होत असते. त्यामुळे सूर्यावर सतत स्फोट होत असतात. सूर्यावरील या स्फोटांमुळे तेथे वारे निर्माण होतात. त्यांनाच सौरवारे किंवा सौरवात असे म्हणतात. हे वारे म्हणजे सौरकणांचा एक झोतच असतो व तो सतत वाहत असतो. सूर्यावरील स्फोट जास्त जोराने झाल्यास त्या वाऱ्यांना खूप वेग येतो

---

## टी. सी. हरवला आहे

जया जनार्दन रकटे या नावाचा इयत्ता बारावी पास टी सी हरवला आहे. बीड ते छत्रपती संभाजीनगर प्रवास दरम्यान हरवला आहे, सापडल्यास संपर्क

**मो.न ९०२१९१९७७९.**
**पत्ता. रा. आहेर चिंचोली, तालुका जिल्हा बीड.**
**पोस्ट सिरसमार्ग.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१७५ दि.२५.०७.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान अनिरूध्द भानुदास तिकांडे, रा.शेवगा, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शुभम अनिरूध्द तिकांडे | मुलगा | २५.१०.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २५/ ०७ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**जा./क्र./न.प./अंबड नामांतर/२०२५/४९०**
**कार्यालय नगर परिषद अंबड**
**दिनांक:-१९/०८/२०२५**
**अर्जदार:-कृष्णा नवनीत राठी**
**प्रकरण:-सर्वे नं-९४१२ प्लॉट नं-IX न.प.मि.नं-१८-६२-IX चे हस्तांतरण करणेबाबत.**

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र.(१८-६२-IX) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -येथे इमारतीचे/ जागेचे नांव बदलून घेऊ इच्छितो ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास याबद्दल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद,अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

चतु:सीमा
पूर्व:-सरकारी रोड
पश्चिम:-शिवनंदा नवनीत राठी यांचा प्लॉट नं.५४
दक्षिण:-रामदयाल किसनलाल झंवर यांचा प्लॉट नं.VIII
उत्तर:-नवनीत बन्सीलाल राठी यांचा प्लॉट नं -IXII

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,अंबड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६११/२०२५**
पंडित भागुजी केंडे विरुध्द निरंक
**(मार्फत अॅड बी.ई. खरात गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे पद्माबाई भ्र. भागुजी केंडे हे / हया दिनांक २१/११/२०२२ मौजे आम्ला, ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क.१. पंडित पि.भागुजी केंडे, वय - ५७ वर्षे, धंदा-नौकरी, रा. आम्ला, ता. गेवराई, जि. बीड, २ . दत्तात्रय भागुजी केंडे वय: ६४ वर्षे, धंदा: शेती, आम्ला ता. गेवराई जि.बीड ह.मु.मुख्य पेठ कानिफनाथ मंदिर कुंभारवाडा जवळ शिक्रापुर पुणे यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे पद्माबाई भ्र. भागुजी केंडे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १८/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २६/०८/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**जा./क्र./न.प./अंबड नामांतर/२०२५/४९१**
**कार्यालय नगर परिषद अंबड**
**दिनांक:-१९/०८/२०२५**
**अर्जदार:-शिवनंदा नवनीत राठी**

प्रकरण:-सर्वे नं-१२ सहान प्लॉट नं-४७ सिटी सर्वे नं-१८६७/ब-५५ व सहान प्लॉट नं-४८ सिटी सर्वे नं-१८६७/ब-५६ चे हस्तांतरण करणेबाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र.( ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला --------येथे इमारतीचे/ जागेचे नांव बदलून घेऊ इच्छितो ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास याबद्दल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद,अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

चतु:सीमा
पूर्व:-प्लॉट नं-४८ मधील भाग
पश्चिम:- प्लॉट नं-४७ मधील भाग
दक्षिण:- १२ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर:- सर्वे नं-१२ मधील जमीन

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३१२ दि.२०.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**(जन्म - मृत्यूची नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३)**

अर्जदार श्रीमान /श्रीमती युनुस लालु शेख रा. टाका ता.अंबड जि. जालना यांनी तहसील कार्यालय अंबड येथे त्यांच्या नामे -शेख आदिल युनुस, मुलगा च्या दि.२४/०६/२००९ पंचायत कार्यालय टाका नगर पंचायत कार्यालय टाका यांचे जाहिर प्रगटन आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यासाठी पाठवित आहेत.तसेच मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन यांचेकडील शा.निर्णय जमृनों २५२५ (ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/ कु.क. दि.१२/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये जाहिर प्रगटन हे अर्जदाराच्या खर्चाने प्रसिध्द करावे असे नमुद केलेले आहे.

त्यामुळे संबधित अर्जदार यांचेकडून जाहिर प्रगटन प्रसिध्द करणे कामीचा खर्च स्विकारण्यात यावा. तसेच जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्याबाबतची कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. व प्रसिध्द केलेले जाहिर प्रगटनाबाबतचे दोन पेपर या कार्यालयास पाठविण्यात यावे. जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत आक्षेप या कार्यालयास लेखी स्वरुपात सादर करावा.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

## टी. सी. हरवला आहे

शिवानी पांडुरंग चोरमले या नावाचा १२ विज्ञान पास टी. सी. व सनद घुंगर्डे हादगाव ते शहागड प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधा.

**:: संपर्क ::**
९७३०००८३६७

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६२०/२०२५**
**बाबु राणुजी कदम विरूध्द निरंक**
**(मार्फत - अॅड बी.ई खरात गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे पार्वती राणुजी कदम हे/हया दिनांक २/०७/२०२० मौजे आम्ला, ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत.अर्जदार क.१.बाबु पि.राणुजी कदम, वय-६५ वर्षे, धंदा-शेती, रा. आम्ला, ता. गेवराई, जि. बीड, २. सुमनबाई प्र.परसराम जगदाळे वय: ७० वर्षे, धांदा: शेती, रा:जायकोचीवाडी ता. माजलगाव जि.बीड ३. राजाभाऊ पि. राणुजी कदम वय ५८ वर्षे धंदा: शेती, रा. आम्ला ता. गेवराई जि.बीड यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे पार्वती राणुजी कदम यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १६/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २८/०८/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**जा./क्र./न.प./अंबड नामांतर/२०२५/४९२**
**कार्यालय नगर परिषद अंबड**
**दिनांक:-१९/०८/२०२५**
**अर्जदार:-कृष्णा नवनीत राठी**
**प्रकरण:-सर्वे नं-९४१२ प्लॉट नं-X न.प.मि.नं-१८-६२-X चे हस्तांतरण करणेबाबत.**

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र.(१८-६२-X) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -येथे इमारतीचे/ जागेचे नांव बदलून घेऊ इच्छितो ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास याबद्दल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद,अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

**चतु:सीमा**
पूर्व:-सरकारी रोड (जालना- बीड)
पश्चिम:-प्लॉट नं.५५ व ५६
दक्षिण:-प्लॉट नं.IX
उत्तर:-जयनारायण बन्सीलाल राठी यांचा प्लॉट द मधील भाग

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,अंबड**

---

## जाहीर प्रगटन

**आमच्या पक्षकारांनी दिलेल्या अधिकार व सूचनेवरून**

तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की मौजे मठजळगाव ता. अंबड जि. जालना येथील जमीनगट क्रमांक ०१ मधील ०२ हेक्टर ६८ आर त्यापैकी ०१ हेक्टर ८८ आर आकार ०४ रुपये ५५ पैसे गट क्रमांक २१६ एकूण क्षेत्र २३ आर पैकी संपूर्ण २३ आर आकार ५० पैसे गट क्रमांक २१९ एकूण क्षेत्र २६ आर गट क्रमांक २५५ मधील एकूण क्षेत्र तीन हेक्टर ४४ आर पैकी एक हेक्टर ९७ आर आकार ०२ रुपये २७ पैसे गट नंबर १७५ एकूण क्षेत्र १३ हेक्टर ४७ पैकी तीन हेक्टर ४७ आर आकार ०५ रुपये ०३ पैसे या जमिनीबाबत आमचे पक्षकार राहुल भगवानराव पोखरकर यांनी वि. दिवाणी न्यायालय अंबड येथे वर नमूद केलेल्या संपूर्ण मिळकतीबाबत दिवाणी दावा दाखल केला असून त्यात हिंदू वडिलोपार्जित अविभक्त कुटुंबाचा त्यांचा हिस्सा त्यांनी मागितला आहे सदर दावा हा अंबड न्यायालयात दाखल असून त्याचा दिवाणी दावा क्रमांक १८५/२०२५ असा आहे सदर दाव्यामध्ये त्यांनी वरील मिळकतीची विक्री, हस्तांतरण, दान गहाण होऊ नये म्हणून तात्पुरता मनाई हुकुम मागितला आहे करिता या मिळकतीबाबत कोणीही कुठलेही हस्तांतरण दान गहाण करून घेईल ते आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही सबब हे जाहीर प्रगटन प्रसिद्धीस दिले आहे त्याची नोंद घ्यावी.

दि. १६/०८/२०२५.

**मार्फत**
अॅड. बी आर देशमुख
अॅड. पी.पी.तेरखेडकर

**जाहीर प्रगटन देणार**
राहुल भगवानराव पोखरकर
रा. मठजळगाव ह.मु. अंबड
ता. अंबड जि. जालना

---

### पान १ वरून...

**ना.पंकजाताई मुंडे यांच्या ....**

आली आहे. जिल्ह्यातील आष्टी येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे नवीन न्यायालय स्थापन करण्यात येणार आहे. या न्यायालयासाठी आवश्यक न्यायिक अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या पदांची निर्मिती तसेच त्यासंबंधित खर्चासही मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे आष्टी व परिसरातील नागरिकांना न्यायासाठी जिल्हा मुख्यालयावर जाण्याची गरज भासणार नाही. ना.पंकजाताई मुंडे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे मंत्रीमंडळात हे दोन मोठे निर्णय झाल्याने जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

**छत्रपती शिवाजी नगरचा ...**

मूर्ती बीडमध्ये येत आहे. या मूर्तीची खास वैशिष्ट्ये म्हणजे तिची कलाकुसर, आकर्षक रंगसंगती आणि आधुनिक डिझाईन.बीड शहरात यंदा गणेशोत्सवाच्या स्वागताला एक वेगळाच रंग चढणार आहे. तेलंगणा राज्यातून प्रथमच सतरा फुट उंचीची बप्पाची भव्य मूर्ती बीड शहरातील मोरया गणेश मित्र मंडळाच्या छत्रपती शिवाजी नगर चा महाराजा मंडळाकडून आणली जाणार असल्याने शहरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.या मूर्तीचे आगमन झाल्यानंतर शहरातील गणेश भक्तांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे.ही मूर्ती खास हाय-फाय डिझाईनमध्ये बनविण्यात आली असून, तिच्या सजावटीसाठी आधुनिक कलाकुसरीचा वापर करण्यात आला आहे. मूर्तीच्या आगमनावेळी ढोल-ताशा,वाजत- गाजत मिरवणूक काढली जाणार आहे.छत्रपती शिवाजी नगरचा महाराजा या मंडळाचे कार्यकर्ते व नागरिक या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी उत्सुक आहेत. बीडकरांसाठी हा गणेशोत्सव विशेष ठरणार असून, शहरात भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी शहरासह तालुक्यातूनही भाविक मोठ्या संख्येने येतील,अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. बीडकरांसाठी हा गणेशोत्सव ऐतिहासिक ठरणार असून, बप्पा मोरयाच्या जयघोषाने संपूर्ण शहर दुमदुमून जाणारा आहे.

**जालना जिल्हा ...**

राबविण्यात आली.या मोहिमेदरम्यान स्विफ्ट डिझायर (क्रमांक चक-४९ -ड-६९५२) या कारमध्ये बेकायदेशीररित्या लोखंडी कोयता आढळून आला. तसेच संबंधित कारमध्ये अनधिकृत सायरन व दिवा देखील बसवलेला आढळून आला. सदर कारचालक सुरेश काशिनाथ पुंगळे (वय २५, रा. दरेगाव, ता. व जि. जालना) याच्याविरुद्ध कदीम जालना पोलीस ठाण्यात पोहेकॉ. गणेश जाधव यांच्या फिर्यादीवरून भारतीय हत्यार कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच, या मोहिमेदरम्यान मोटार वाहन कायद्यानुसार एकूण ३४,५५०/- प्रलंबित दंड वसूल करण्यात आला.दरम्यान, २४ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा वाहतूक शाखेचे अंमलदार आष्टी-पात्री रोडवर तपासणी करत असताना, सुखदेव लक्ष्मण सोनवणे (वय ३२, रा. बनगाव, ता. अंबड, जि. जालना) या इसमास मोटारसायकल (क्रमांक चक-२१ इघ-८१४५) वर संशयास्पद स्थितीत आढळून आल्यानंतर त्यास थांबवून चौकशी करण्यात आली. त्यावेळी गाडीच्या चेचिस आणि इंजिन नंबरमध्ये तफावत आढळून आली. यामुळे सदर वाहन चोरीचे असण्याचा संशय निर्माण झाला असून, सोनवणे यास मोटारसायकलसह पुढील कारवाईसाठी आष्टी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक मा. श्री अजय कुमार बंसल व अप्पर पोलीस अधीक्षक मा. श्री आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली, सपोनि. चंद्रकांत चातुरे, कृष्णा चव्हाण, गणेश जाधव, संदीप बोंद्रे, विजय लोखंडे, महमंद चौधरी, राजेश दहिवाळ यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.या मोहिमेमुळे जिल्ह्यात वाहतूक शिस्तीबरोबरच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलिसांची कार्यक्षमता अधोरेखित झाली असून, भविष्यात अशा प्रकारच्या अधिक मोहिमा राबविण्यात येणार असल्याचेही संकेत पोलिसांकडून देण्यात आले आहेत.

---



# स्व. बाबासाहेब आगेच्या पत्नीला भारिप्र मंडळात कायमस्वरूपी नोकरी

## मुख्यमंत्री फडणवीस व भाजपा आगे परिवाराच्या पाठीशी - डॉ.ओमप्रकाश शेटे

माजलगाव (प्रतिनिधी)

भारतीय जनता पक्षाचे निष्ठावंत शिलेदार, प्रचारक आणि लोकसभा विस्तारक, स्व. बाबासाहेब आगे यांच्या पत्नी श्रीमती पल्लवी बाबासाहेब आगे (सोळंके) यांना भारतीय शिक्षण प्रसारक मंडळात कायम स्वरुपी नोकरीचे (प्रयोगशाळा परिचर) नियुक्तीपत्र देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप अध्यक्ष रवींद्र चव्हाण साहेब यांच्या हस्ते हे नियुक्तीपत्र मुख्यमंत्री महोदयांच्या सागर या निवासस्थानी त्यांना सुपूर्द आले. निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पण यांचा आदर्श असलेल्या या उमद्या कार्यकर्त्याच्या कुटुंबाला पक्ष व सरकार वाऱ्यावर सोडणार नसल्याचे आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी सांगितले.

निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पण यांचा आदर्श असलेल्या स्व. बाबासाहेब आगे या उमद्या कार्यकर्त्याचा काही महिन्यांपूर्वी एका माथेफिरूने निर्घृण खून केला. या क्रूर घटनेने केवळ बीड जिल्हाच हादरला नाही, तर एका कुटुंबाचे आयुष्यच उद्ध्वस्त झाले. उघड्यावर पडलेल कुटुंब सावरण्यासाठी त्याच्या पत्नीला बळ देणं गरजेच होत. त्या भगिनीला डोंगराएवढ दु:ख बाजूला सारून वृद्ध सासू सासरे व छोट्या मुलासाठी धैर्याने परिस्थितीशी सामना करण्याशिवाय पर्याय नव्हता. यासाठी स्वतःच्या पायावर उभा राहण्याची व कायमस्वरूपी नोकरीची गरज होती.

भारतीय शिक्षण प्रसारक मंडळ ही सामाजिक भान असलेली संवेदनशील संस्था आहे. या सस्थेत पल्लवीताईला कायम स्वरुपी नोकरी मिळावी यासाठी संस्था चालकांकडे डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी वारंवार पाठपुरावा व विनंती केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनीही शब्द टाकला. भाशिप्र संस्थेने संघाच्या मुशीत घडलेल्या बाबासाहेब आगे याच्या परिवाराला योग्य न्याय दिला,त्याचे मानावे तेवढे आभार कमीच असल्याचे प्रतिपादन डॉ.शेटे यांनी केले.

वृद्ध आई व पत्नीला अश्रू अनावर

आगे कुटुंबाने मुख्यमंत्री महोदयांच्या सागर निवासस्थानी देवेंद्र फडणवीस आणि भाजप अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली. उभयतांनी त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केल्यानंतर स्व. बाबासाहेब आगे यांच्या मातोश्री राधाबाई आगे व पल्लवी आगे (सोळंके) यांना अश्रू अनावर झाले, त्यांच्या संयमाचा बांध फुटला. यावेळी उपस्थित सर्वांचे डोळे पाणावले. डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी हा योग जुळवून आणला त्याबद्दल त्यांचेही आगे कुटुंबाच्या नातेवाईकांनी आभार मानले.

---

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटणाव्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. मारुती गणपती चाळक, रा. लव्हरी, ता. केज, जि. बीड यांनी मौजे ढाकेफळ, ता, केज, जि. बीड शिवारातील श्री. नारायण बाबू थोरात, रा. ढाकेफळ, ता. केज यांच्या मालकीचा सर्वे नंबर ४७/४ मधील एकुण क्षेत्र ०१ हे ३८ आर पैकी खुला प्लॉट/ जमिन ज्याचे क्षेत्रफळ ००-०२ आर असुन त्याच्या चतु:सिमा पुर्वेस - कमल नारायण थोरात, पश्चिमेस - कमल नारायण थोरात, दक्षिणेस सर्वे नंबर बांध आणी उत्तरेस-केज-बीड रोड ही मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचा ठराव केलेला आहे. सदरील मिळकती बाबत कोणाचा काही आक्षेप अथवा हरकत असेल तर या जाहीर प्रगटणाचे प्रसीध्दीपासुन सात दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली दिलेल्या नंबर वर किंवा आम्हाला प्रत्यक्ष भेटुन कळवावा. मुदतीत आक्षेप न आल्यास सदरील खरेदीचा व्यवहार नोंदणीकृत खरेदीखत करुन पुर्ण केला जाईल. त्यानंतर आलेले आक्षेप किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. करीता हे जाहीर प्रगटण देण्यात येते.

दिनांक- २६/०८/ २०२५.
मो.९४२२२४०५४९/८६२३८१०३०२.

**मार्फत,**
**अॅड. जे. डी. चाळक,**
**समतानगर, केज,**
**ता. केज. जि. बीड.**

**जाहीर प्रगटन देणार**
श्री. मारुती गणपती चाळक,
रा. लव्हरी, ता. केज,
जि. बीड.

# कोल्हापूरच्या संजय गुरवांची आयुर्वेदिक औषधी ठरतेय अत्यंत गुणकारी

## दृष्टीदोषासह मधुमेह (शुगर), सांधीवात आणि लीव्हर-किडनी दोष धारकांसाठीही संजीवनी

अंबाजोगाई/सुनिल सिरसाट

कोल्हापूर येथील गुरव परिवाराची आयुर्वेदिक औषधी डोळ्यांचा आजार-विकार असणाऱ्या दृष्टीदोष धारकांसह मधुमेह, लीव्हर-किडनी, सांधीवात आणि नशा मुक्तीसाठी संजीवनी ठरते आहे. कोल्हापूर शहरापासून अगदी जवळच ज्योतिबाच्या पायथ्याशी असलेल्या छोट्या गावातील असणारे गुरव कुटुंब गेले अनेक वर्षांपासून विविध आजारांवरती ज्योतिबाच्या आणि पन्हाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या वनऔषधींच्या माध्यमातून बनवल्या जाणाऱ्या आयुर्वेदिक औषधींच्या साह्याने मधुमेह (शुगर), रक्तदाब (बीपी), लठ्ठपणा, आम्लपित्त, मुतखडा, किडनी, लीव्हर, संधीवात, व्यसनाधिनता, अपचनासह डोळ्यांच्या आजार-विकारासंबधीत आयुर्वेदिक औषधी देत असून त्याचा अनेक तरुण व वयोवृद्ध रुग्णांना चांगला फायदा झाल्याची चर्चा दिवसेंदिवस सातत्याने कानावर पडते आहे.

त्यांच्या या सर्व गुणकारक औषधांची ख्याती आता थेट मराठवाड्यापर्यंत पोहचली असून बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई येथे संजय गुरव हे अलीकडच्या तीन-चार महिन्यांपासून सातत्याने दर बुधवारी सार्वजनिक बांधकाम कार्यालय (बी अँड सी) अंबाजोगाई येथे एका शेटर (शेड) मध्ये वरील विविध आजार असणाऱ्या रुग्णांना आपल्या वेगवेगळ्या आयुर्वेद औषधाने निरनिराळ्या व्याधींवर उपचार करत असून त्यांची डोळ्यासबंधीतील औषधी तथा ड्रॉप तर चांगलाच प्रभावी ठरत असून अनेकांची दृष्टी सुधारली असून काही रुग्णांना तर मोतीबिंदू-काचबिंदू सह डोळ्यांच्या इतर समस्यांमध्येही मोठा फायदा होत असल्याची चर्चा स्वतः रुग्णांकडूनच ऐकावयास मिळत आहे. त्यांची औषधी अत्यंत दर्जेदार असल्याने इतर आजारांवरही गुरव यांच्या डोळ्यांच्या औषधीप्रमाणे ईतरही विकार-आजारांवरील आयुर्वेदिक औषधींची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात लाभकारक ठरत असल्याची माहिती खुद्द ही औषधी घेत असलेल्या रुग्णांनीच दिली आहे. यामुळे आमच्या प्रतिनिधीनी थेट रुग्णांनाशीच संपर्क करत चर्चा केली असता प्रत्येक रुग्ण हा प्रत्येक व्याधी व आजारांबाबतीत सकारात्मकच अनुभव सांगत असल्याने तूर्तास तरी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई-धारूर तालुक्यातील रुग्णांसह मांजरसुंबा परिसर आणि कळंब येथील रुग्णांना गुरव



यांच्या औषधीचा मोठा फरक पडत असून अनेक जणांनी चक्क आमचे ऑपरेशन ठळले, आमची शुगर अगदी लेवल मधे आली, कुणाच्या गुडग्यांचे ऑपरेशन ठळले, तर काहींचे लीव्हर-किडनीचे बिघडलेले काम पुर्वपदावर आले असल्याची प्रतिक्रिया काहींनी दिल्याने आमच्या प्रतिनिधींनी थेट संजय गुरव यांच्याशीही वार्तालाप केला असता मी डॉक्टर नाही परंतु माझ्या कुटुंबाची या औषधाची अनेक वर्षांपासूनची परंपरा असून कोल्हापूर आणि कोल्हापूर परिसरात माझे कुटुंब आणि समर्थ सोशल फाऊंडेशन आणि न्युट्रीफील हेल्थ प्रोडक्टस् प्रा.लि. तसेच शिवशंभू निवासी व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही मिळून दृष्टीदोषासह ईतरही रोग-विकार असणाऱ्या रुग्णांना आमच्या औषधीचा कसा चांगला फायदा होईल यावर मनापासून काम करत असुन अलिकडच्या काळात आमच्या या आयुर्वेद संस्थेच्या औषधींचा सर्व प्रकारच्या रुग्णांना खुप चांगल्या प्रमाणात फायदा झाल्यानेच आम्ही कोल्हापूरच्या बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आणि आता महाराष्ट्रभरात अनेक ठिकाणी आमच्या औषधींचा चांगलाच प्रभाव दिसून येत असल्याने आम्ही गुरव कुटुंबीय या संस्थेसोबत व्यसनमुक्तीचे विशेषत: दारु सुटण्यासाठीचे मोठे काम करत असुन यासाठी आम्ही रुग्णास फक्त दोन महिन्यांत व्यसनमुक्त करुनच बाहेर सोडतो अन्यथा सोडतच नसल्याने आतापर्यंत अनेक रुग्णांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद वाढला असून ज्योतिबाच्या कृपेने आणि आमच्या व संस्थेचे हातगुणाने रुग्णांना मोठा फायदा होत असल्याने त्या आनंदाचे शब्दात मोजमाप न करता येणारे असल्याचे समाधान आम्हा कुटुंबियांना आणि समर्थ फाऊंडेशनसह व्यसन मुक्ती केंद्राला लाभत असून ज्योतीबाच्या आणि पन्हाळगडाच्या डोंगरपट्ट्यात सर्वच अत्यंत प्रभावी व गुणकारी औषधी उपलब्ध असून आम्ही ती गोळा करूनच त्यापासून अतिशय दर्जेदार औषधांची निर्मिती करून अगदी परवडणाऱ्या माफक दरात रुग्णांना ती उपलब्ध करून देत असल्याने आता दिवसेंदिवस मागणीही मोठ्या प्रमाणात वाढली असून ती पुरवणेही आम्हाला कठीण जात आहे.

परंतु आम्ही संयुक्त विद्यमाने सर्वचजण मागे न हटता नित्यनेमाने ती जमा करून त्या माध्यमातून पुण्यकारक सेवा करत असून दख्खनचा राजा आमचे दैवत ज्योतिबाच्या कृपेने आमच्या प्रयत्नांना चांगले यश लाभत असून विशेष करून आमची डोळ्यांची औषधी तथा ड्रॉप तर रुग्णांना खूपच लाभधारक ठरत असून आता तर ईतर रोग-विकारांवरील औषधींचाही डोळ्यांच्या रुग्णांईतकाच समाधानकारक रिझल्ट मधुमेह, लीव्हर-किडनीच्या संबंधितही येत असल्याने रुग्णांनाचे समाधानच आम्हाला खूप काही सांगून जात असल्याने आम्ही हे आमचे सामाजिक दायित्व समजून आमचा कौटुंबिक वारसा समर्थ फाऊंडेशनच्या मदतीने पुढे चालवत असल्याची प्रतिक्रिया खुद्द संजय गुरव यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली. तेंव्हा याचा जास्तीत जास्त रुग्णांनी फायदा घेऊन दृष्टीसंबंधीचे व इतरही आजारांचे दोष विकार बरे करण्यासाठी आमच्या औषधींचा फायदा घ्यावा असे आवाहनही संजय गुरव यांनी आमच्या माध्यमातून केले आहे.



# हुतात्मा पानसरे प्राथमिक शाळेत माती पासून गणपती तयार करणे कार्यशाळा संपन्न

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद शहरातील हुतात्मा पानसरे प्राथमिक - शाळेत माती पासून इको फ्रेंडली गणपती तयार करणे ही कार्यशाळा उपक्रमशील शिक्षक विठ्ठल हिमगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे प्रभारी मुख्याध्यापिका सौ. सविता नोरलावार हे होत्या तर कार्यशाळेत श्री राठोड रवींद्र व श्री सौ. अश्विनी रामोड यांनी मुलांसमवेत कार्यशाळेत सहभाग नोंदविला. क्ले च्या माती पासून व उपलब्ध काळ्या माती पासून गणपती तयार करण्याचे कला मुलांच्या अंगात उतरवणे. मुलांच्या उपजत गुणांना चालना देणे व त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी दरवर्षी माती पासून गणपती तयार करण्याची कार्यशाळा हुतात्मा पानसरे प्राथमिक शाळेत संपन्न झाली. शाळेतील उपक्रमशील शिक्षक सर्वप्रथम गणेश उत्सव सणाबद्दल सविस्तर माहिती दिली व माती पासून मुलांकडून गणपती तयार करून घेतले. या कार्यशाळेत जवळपास साडे तीनशे मुलाने सहभाग नोंदवला. दोन तासाच्या कार्यशाळेत सगळी मुलं गणपती तयार करण्याचे तंत्र आत्मसात केले. प्रसंगी सर्व शिक्षक विद्यार्थ्यांच्या मदतीला होते. तयार झालेल्या मातीपासूनच्या गणपती मूर्तीला मुले विविध रंग देण्यात आले. शाळेत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी चिमुकल्या मुलांनी माती पासून गणपती तयार करणे कार्यशाळेत आनंदाने सहभागी झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे प्रभारी मुख्याध्यापिका सविता नोरलावार ह्या होत्या होते कार्यशाळा प्रमुख उपक्रमशील शिक्षक विठ्ठल हिमगिरे होते.सौ. सुनीता शाहू, श्री. राजू सिदूलवार पतसंस्थेचे सचिव श्री विठ्ठल नरवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.नवोपक्रमाचे संस्थेचे सचिव विश्वनाथराव पाटील बन्नाळीकर साहेबांनी तोंड भरून कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष श्री राम पाटील बन्ना ळीकर, कोषाध्यक्ष राम पाटील बाळापूरकर, सहसचिव सुरेश गंजेवार, डॉ. कमल किशोर काकानी, दिनेश सारडा,इनानी सेठ, नारायण शाहू, संचालक व विश्वस्त मंडळांनी तसेच पानसरे हायस्कूलचे मुख्याध्यापक सन्मुख बेंबरेकर, प्राथमिकचे मुख्याध्यापक श्री गंगाधर पालकृतवार पर्यवेक्षक श्री मोहन फुलकंठवार,नरेश जिंदमवार, केंद्रप्रमुख आबासाहेब उसकेलवार या उपक्रमासाठी कौतुक करून शुभेच्छा दिल्या. सदरील उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सदिल उपक्रम व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सहशिक्षक श्री नवीन लोकावाड बजरंग परसुरे,श्री हनुमंत शिंदे, श्री पांडुरंग दारमोड सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. आभार सौ.प्रणिता प्यादेकर यांनी मांडले.

# वैद्यनाथाच्या परळी नगरीतील विधायक कार्य करणारे श्री.चेतन सौंदळे भूमीपूत्र गौरव पुरस्काराने सन्मानित

परळी (प्रतिनिधी)

महाराष्ट्रातील अग्रगण्य दै.लोकमतच्या वतीने बीड जिल्हयातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या प्रतिभासंपन्न,कर्तृत्वान व्यक्तिमत्वांचा भूमीपूत्र गौरव पुरस्कार राजस्थान राज्याचे राज्यपाल महामहिम हरीभाऊ बागडे(नाना) यांच्या हस्ते सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणारे ज्योतीर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या परळी नगरीचे सुपुत्र नगरसेवक चेतन सौंदळे यांच्यासह बीड जिल्हयातील भूमिपुत्रांना शनिवार दि.२३ ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात आला आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री,एडिटर इन चीफ लोकमत मीडिया राजेंद्र दर्डा व लोकमत छत्रपती संभाजी नगर आवृत्ती चे संपादक नंदकिशोर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

राजकारण असो की, समाजकारण, लोकहितांसाठी धडपडणारे,सदोदित कार्य करणारे तरूण नेतृत्व म्हणून चेतन सौंदळे यांनी आपली आगळीवेगळी ओळख निर्माण केली आहे. पक्ष कुठलाही असो राजकीय नेतृत्वाचा आपल्या परळी शहराच्या व बीड जिल्हयाच्या विकासासाठी कसा फायदा होईल हा विचार मनात ठेवून चेतन सौंदळे यांचे कार्य सुरू असते.राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर यांच्या भव्य-दिव्य व नेत्रदिपक ८२ व्या श्रावणमास तपोनुष्ठानाच्या २१ दिवस अद्वितीय सोहळयाचे आयोजन म्हणजे चेतन



सौंदळे यांच्या सर्वोत्कृष्ट कौशल्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणता येईल.

तपोनुष्ठानाचे स्वागतोत्सुक माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे व पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री.वैजनाथ देवस्थान ट्रस्ट यांच्या योगदानातून सर्व समाज बांधव यांच्या अथक परीश्रम व समर्पित जीवाभावाच्या अनमोल सहकार्यामुळे पार पडलेला तपोनुष्ठान सोहळा हा चेतन अरविंद सौंदळे यांच्या अध्यक्षपदाच्या जबाबदारी व नियोजनाद्वारे केवळ धार्मिकच नव्हे तर लोक कल्याणकारी, समाजाभिमुख, अभूतपूर्व, अविस्मरणिय व ऐतिहासिक असा संपन्न झाला.चेतन सौंदळे हे सध्या शिक्षण क्षेत्रात श्री.केदारी महाराज विद्यामंदीर,नंदनज ता.परळी-वैजनाथ,जि.बीड येथे मुख्याध्यापकपदी कार्यरत असून मागील अठ्ठावीस वर्षापासून अध्यापनासोबत विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाचे कार्य अभियोग्यता चाचणी द्वारे शैक्षणिक मार्गदर्शन व समुपदेशन चे काम सुरू आहे तसेच अरूणाचल प्रदेश,आसाम या पूर्वोत्तर राज्यांमध्ये व महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक व माध्यमिक,पुणे बोर्डाच्यावतीने छत्रपती संभाजीनगर विभागातून विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाकरिता नियुक्ती करण्यात येवून हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले.श्री.संगमेश्वर शिक्षण संस्थेत १६ जुन १९९७ पासून अध्यापकपदी कार्यरत असून बारावी/दहावी वर्गात प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांनी कुठल्याही प्रकारची चिंता,भीती,दडपण न बाळगता तणावमुक्त व आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे व भविष्यातील यशस्वीतेसाठी आवड,क्षमता व व्यक्तिमत्तावानुसार विविध क्षेत्रात यशस्वीतेचा मार्ग उपलब्ध असल्याचे विद्यार्थी घडविण्याचा मुख्य उद्देश सौंदळे यांच्यावतीने केला जात आहे.

कार्याचा मुख्य उद्देश-

कर्तव्यातून सामाजिक जबाबदारी पार पाडणे यासोबतच प्रत्येक वंचित घटकांपर्यंत मदत व विविध योजनांचा लाभ मिळवून देऊन आपले शहर व परीसर स्वच्छ,सुंदर व पर्यावरण संतुलित बनविणे आहे.

यशोगाथा व योगदान

द्वादश पंचम ज्योतीर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या परळी नगरीचा भारत सरकारच्या कॉरीडॉर व प्रसाद योजने अंतर्गत माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे,पर्यावरण मंत्री

# पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या आमेर अजमेर पठाणच्या कुटुंबियांना धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून प्रशासनाकडून चार लाखांची मदत

युवक नेते अजय मुंडे, तहसीलदार यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या हस्ते कुटुंबीयांना मदतीचा धनादेश प्रदान

परळी (प्रतिनिधी)

परळी वैद्यनाथ तालुक्यातील पांगरी परिसरातील पुलाच्या कामावर असताना परळी शहरातील कामगार आमेर अजमेर पठाण या तरुणाचा पुराच्या पाण्यात वाहून जाऊन मृत्यू झाला होता; परळीचे आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून सदर तरुणाच्या कुटुंबीयांना आज प्रशासनाच्या वतीने चार लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे यांच्यासह परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते या चार लाखांच्या धनादेशाचे वितरण पठाण यांच्या वारसांकडे करण्यात



आले. धनंजय मुंडे यांनी आपत्ती व्यवस्थापन मधून मयत कामगाराच्या वारसांना आर्थिक साहाय्य करण्याचे निर्देश तहसीलदार तथा स्थानिक प्रशासनास दिले होते त्या अनुषंगाने ही मदत तातडीने करण्यात आली. याप्रसंगी युवक नेते अजय मुंडे, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, माजी उपनगराध्यक्ष आयुब भाई पठाण, अजीज कच्ची, रवी मुळे, अल्ताफ पठाण, नय्युम शहा, राजू भाई, बद्दल भाई, स्थानिक चे तलाठी विष्णू गीते, खाजाभाई, जफर भाई, बकश भाई, अन्सारी सर यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# व्यसनाचा शेवट विनाशाकडे जातो, त्यामुळे तरुणांनी व्यसनमुक्त राहण्याची गरज - पो. नि. धनंजय ढोणे

परळी (प्रतिनिधी)

कोणत्याही व्यसनाचा शेवट हा विनाशाकडे जातो तसेच स्वतःबरोबर कुटुंबाचेही प्रचंड नुकसान होते. या संकटातून बाहेर येण्यासाठी तरुणांनी व्यसनमुक्त राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन संभाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी केले. ते परळीतील सिद्धार्थ नगर मध्ये आयोजित करण्यात आलेल्या व्यसनमुक्ती मार्गदर्शन शिबिरात बोलत होते.

सिद्धार्थ नगर येथील त्रिशरण बुद्ध विहारात दिनांक २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटीच्या वतीने व्यसनमुक्ती मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ माधवराव ताटे हे होते. तर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, ज्येष्ठ मार्गदर्शक




डी.जी.मस्के, पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, पत्रकार वैजनाथ गायकवाड सामाजिक कार्यकर्ते संजय मस्के, संयोजक गौतम साळवे आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलतांना पो.नि.धनंजय ढोणे म्हणाले की, आजचा तरुण हा उद्याचा देशाचा आधारस्तंभ आहे. तो आधारस्तंभ डळमळीत असेल, व्यसनात गुंतलेला असेल तर स्वतःचे तर नुकसान होतेच होते शिवाय त्याच्या कुटुंबाचेही अतोनात नुकसान होते. आपला मुलगा काय करतो? काय नाही? याकडे पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. तरुणांना उद्देशून बोलताना पुढे ते म्हणाले की मित्र जोडताना ते कसे आहेत? त्यांच्या सवय काय? त्यांना कोणते व्यसन आहे का? याचाही युवकांनी अभ्यास केला पाहिजे. वाईट मित्रांपेक्षा चांगले मित्र जोडा असे आवाहनही त्यांनी केले.

याप्रसंगी माधवराव ताटे,डी .डी.जी.मस्के,मिलिंदराव घाडगे वैजनाथ गायकवाड, यांनी आपले विचार मांडले. तर नुकताच समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल माधवराव ताटे यांचा तर महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पत्रकार वैजनाथ गायकवाड यांचा सिद्धार्थनगर जयंती उत्सव कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व मान्यवर पाहुण्यांचे हस्ते तथागत गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

या कार्यक्रमास विजय हजारे,कैलास तरकसे, सिद्धार्थ साळवे, अनिल सोनवणे, विकास गायकवाड,राम मुंडे, समाधान कांबळे,नंदू गायकवाड, किशोर बहादुरे,अशोक ढोकळे, अनिल कांबळे,आकाश गायकवाड, मंगेश मस्के,सनी तरकसे,बादल घाडगे, विशाल गायकवाड, भाऊराव ताल्डे,अजय पोटभरे, ओमकार कस्बे,आनंदराज साळवे,सुमित साळवे, अविनाश सुरवसे,अमोल सावंत, सुदर्शन कांबळे, अतुल मुंडे, तुळशीराम वैतागे, सनी चव्हाण, जितेंद्र जाधव,दिपक बहादुरे,मिलिंदराज साळवे,बाळा घाडगे आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जामनेर येथील सुलेमान पठाण हत्या प्रकरणात आरोपीवर कठोर कारवाई करण्यात यावे: अरफात खान




प्रतिनिधी: जामनेर येथे सुलेमान पठाण या १९ वर्षीय तरुणाची जमावाने लव्ह जिहाद सारख्या निराधार आरोपाखाली निर्दयीपणे मॉब लिंचिंग करून हत्या केली आहे. ही घटना अमानुष, भयानक आणि राज्यातील कायदा व सुव्यवस्थेला धोकादायक आहे.अशा प्रकारच्या घटनांमुळे मुस्लिम समाजातील सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून समाजातील सौहार्द व शांतता धोक्यात येत आहे. त्यामुळे या गुन्ह्यातील आरोपींना कठोर शिक्षा होणे अत्यावश्यक आहे.जामनेर येथील सुलेमान पठाण या तरुणाची मॉब लिंचिंग करून झालेल्या हत्येप्रकरणी संबंधित आरोपींवर एमपीडीए मोक्का कायदा अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावेत. तसेच पीडित कुटुंबाला शासकीय स्तरावर योग्य ती मदत आणि न्याय देण्यात यावा. अशी मागणी बीड जिल्हाधिकारी मार्फत मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदनाद्वारे,मौलाना आझाद युवा मंचच्या वतीने करण्यात आली.



आज मदरसा अहैया उल उलुम उस्मानाबाद धाराशिव येथे विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच भविष्यात रोजगाराची संधी उपलब्ध होण्यासाठी त्यांच्यामध्ये कौशल्य निर्माण व्हावे यासाठी माझ्या वतीने दोन शिलाई मशीन देण्यात आल्या तसेच दररोज तास दोन तास याची ट्रेनिंग देण्यात येणार याबाबत कार्यक्रम पार पडला यावेळी व्यासपीठावर सामाजीक कार्यकर्ते आमीर शेख,भाजपचे अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निहाल काजी, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार महाराष्ट्र प्रदेश संघटक खालील पठाण, राष्ट्रवादी शहर कार्याध्यक्ष अकबर पठाण, मौलाना रहमतुल्लाह साहब, मौलाना आयुब साहब, कारी निसार साहब, मौलाना हरून साहब औसा, शेख हुसेन साहब, मौलाना अकबर साहब, यांच्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम उत्साहात पार पडला भविष्यात मदरसा यामध्ये कॅम्पुटर प्रशिक्षण देण्यासाठी आम्हा सर्वांच्या वतीने प्रयत्न करण्यात येतील...

# ३१ ऑगस्ट रोजी पोहरादेवी येथे भटके विमुक्त दिनाचे आयोजन

## आ.बाबुसिंग महाराज, रामेश्वरभाऊ नाईक व किसनभाऊ राठोड यांची प्रमुख उपस्थिती

गेवराई (प्रतिनिधी)

इंग्रजांच्या जोखडातून मुक्ती मिळाल्यानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले,हे खरं असलं तरी या देशातील शेकडोंच्या संख्येने असणारे व जगण्यासाठी रोज मरण यातना भोगत असलेल्या भटके विमुक्तांना ३१ ऑगस्ट १९५२ म्हणजे तब्बल पाच वर्षे उशिरा स्वातंत्र्य मिळाले आहे. यावर्षी भाजपा-महायुती सरकारने ३१ ऑगस्ट हा भटके विमुक्त दिवस म्हणून राज्यभर साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याअनुषंगाने देशातील बंजारा समाजाची पवित्र काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या वाशिम जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र पोहरादेवी येथील भक्तीधाम या धार्मिक संस्थानात रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत भटके विमुक्त दिवस अत्यंत



थाटामाटात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे.


बंजारा समाजाची देशपातळीवरील सर्वात मोठी संघटना म्हणून नावाजलेल्या असलेल्या राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या वतीने सदरील भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला बंजारा समाजाचे



धर्मगुरू तथा आमदार बाबुसिंगजी महाराज, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर भाऊ नाईक,बंजारा तिर्थक्षेत्र बारा धामचे निर्माते,भगवंत सेवक किसनभाऊ राठोड व तज्ञ मंडळी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.भटके विमुक्त हा दिवस राज्य व जिल्हा स्तरावर साजरा करण्यात यावा,सदर दिवशी भटक्या विमुक्त समाजाच्या संस्कृतीचे जीवनमूल्ये, परंपरा दर्शविणारे विविध सामाजिक, सांस्कृतिक,शैक्षणिक व माहीतीपूर्ण उपक्रम राबविण्यात यावे असे आवाहन महाराष्ट्र शासनाच्या वतीने करण्यात आहे.शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी व भटके विमुक्त समाजाच्या वर्तमान काळातील सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक धार्मिक व राजकीय विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.बंजारा,लबाणा सह वडार,कैकाडी,तिरमली, टकारी,नंदीबैलवाले, गोपाळ,कुरमोडेजोशी,

वासुदेव,मरीआईवाले बेलदार या व इतर भटक्या विमुक्त जातींना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करावी या उद्देशाने पोहरादेवी येथील कार्यक्रमात भटक्या विमुक्तांच्या जीवनात अमुलाग्र बदल व्हावा यासाठी अनेक ठराव पारित करून महायुती सरकारकडे रामेश्वरभाऊ नाईक व किसनभाऊ राठोड यांच्या नेतृत्वाखाली सादर केले जाणार आहेत.सदरील कार्यक्रमासाठी महंत जितेंद्र महाराज,कबीरदास महाराज,सुनील महाराज, शेखर महाराज,यशवंत महाराज,राष्ट्रीय बंजारा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष विलासभाऊ राठोड,राष्ट्रीय बंजारा राजकीय परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रा.पी.टी.चव्हाण,राष्ट्रीय महासचिव तथा भाजपचे नेते अँड.पंडितभाऊ राठोड, प्रदेशाध्यक्ष भिकणभाऊ जाधव,राष्ट्रीय प्रवक्ते मधूकरभाऊ जाठोत,डॉ जगदिशभाऊ सकवाण,प्रदेश प्रवक्ते अमोलभाऊ पवार, ओएसडी निलेश भाऊ जाधव, युवा नेते युवराज राठोड,प्रदेश उपाध्यक्ष प्रेमकिसन भाऊ राठोड यांची देखील उपस्थिती राहणार आहे.

# पत्रकार रविंद्र राऊत ची कन्या धनश्री एमबीबीएस पात्र




माजलगाव (प्रतिनिधी)

येथील पत्रकार तथा दस्तऐवज लेखक रविंद्र मधुकर राऊत यांची कन्या धनश्री रविंद्र राऊत रा.कवडगाव(बु)ता.वडवणी ह.मु.अशोकनगर,माजलगाव हि एमबीबीएस डॉक्टर च्या शिक्षणासाठी पात्र झाली आहे. गुणवत्ते नुसार शासकीय कोट्यातून कु.धनश्री राऊत हि बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात गुणवत्तेनुसार प्रवेशपात्र ठरली ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. तसेच तीचे मुळगाव कवडगाव(बु) ता.वडवणी येथील चार विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेत आहेत तर याच गावातील पोलीस खात्यात २०ते २२ युवक कार्यरत आहेत.धनश्री राऊतने अतिशय मेहनतक,जिद्द, चिकाटीने स्वयं अध्ययनातून तिने हे यश मिळविले आहे. तिने दहावीपर्यंत मॉडेल इंग्लिश स्कुल,माजलगाव येथे शिक्षण पूर्ण केले तर बारावीचे शिक्षण लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथे पुर्ण केले.हे यश मिळाल्याने तिचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे तर पुढील यशस्वी वाटचाली करीता सुधाकर देशमानेसर,डॉ. स्वराज देशमाने व कुटुंबियांकडून शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.

# मानाचा युवराज गणेश मित्र मंडळाची कार्यकारिणी जाहीर

कडा (प्रतिनिधी)

येथील मानाचा गणेश मंडळ म्हणून ओळख असलेला बाराभाई गल्लीतील मानाचा युवराज गणेश मित्र मंडळाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. युवराज गणेश मित्र मंडळ हे गत ५५ वर्षांपासून सार्वजनिक गणेशोत्सव परंपरा जोपासत आले आहे. गणेशोत्सव सोहळा २०२५ साजरा करण्यासाठी मंगळवार रोजी दुपारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वानुमते पुढीलप्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्ष पदी सुरेश उर्फ बाबु तारू, उपाध्यक्ष पदी महेश दळवी तर सचिवपदी सागर बोराटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी मंडळाचे पाच वेळेस अध्यक्ष पदी







राहणारे पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यद,घन;शाम ढोबळे पाटील, पोलिस उपनिरीक्षक किरण राऊत,आल्ताब शेख,अविनाश ढोबळे,विघ्नेश तारू, शुभम तारू,आरबाज तांबोळी, शिवम इंगवले,आरिफ शेख,ओंकार जठाडे,सलमान सय्यद, विशाल बोराटे,निलेश ढोबळे, आदित्य मोरे, गणेश जठाडे,आवेज पठाण,दर्शन दळवी,मुसेब पानसरे,महेश होळकर,प्रसाद नांगरे,आयान शेख,केतन खंदारे,विक्रम तारु,शिवम तारु, मोईन शेख,अलतमश सय्यद, तन्वीर खान,आकिब खान,सागर खामट,शोएब पानसरे,मुस्तफा सय्यद,रूषी थेटे,आनंद पाचारणे,सह आदी सदस्य उपस्थित होते.

# आज देशाला नेत्याची नाही तर कार्यकर्त्यांची गरज - ॲड. अजित देशमुख

पुणे (प्रतिनिधी)

देशात आज समाजाचे प्रबोधन होणे आवश्यक आहे. लोकविकास आणि लोकशिक्षण गरजेचे झाले असून त्यासाठी कार्यकर्त्यांनी अहोरात्र प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे स्वराज्य जनजागृती परिषदेच्या माध्यमातून आपल्याला लोकशिक्षण आणि लोकजागृतीची चळवळ उभी करावयाची आहे. व्यक्तीला नव्हे तर भ्रष्ट व्यवस्थेला विरोध या तत्त्वाने ही संघटना चालणार असून जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी या संघटनेत सहभाग नोंदवावा. आज नेत्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे देशाला आज नेत्याची नाही तर कार्यकर्त्याची गरज असल्याचे प्रतिपादन स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ड. अजित एम. देशमुख यांनी केले.

पुणे येथील मध्यवस्तीत असलेल्या गांजवे चौकातील पत्रकार संघाच्या भवनांमध्ये सुंदर असा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात बोलताना ड. अजित देशमुख पुढे म्हणाले की, कार्यकर्ते उभे




करण्यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सक्रिय होणे आवश्यक आहे. राज्य, जिल्हा, तालुका स्तरापर्यंत लवकरात लवकर पोहोचण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे पदाधिकाऱ्यांसोबत कार्यकर्त्यांनी देखील संघटन वाढीसाठी प्रयत्न करावेत. कार्यकर्त्यांना घडवण्यासाठी मेहनत घेतली जाईल. कार्यकर्त्यांना काम कसे करावे, याचे प्रशिक्षण देखील वेळोवेळी दिले जाईल, असेही ड. देशमुख यावेळी म्हणाले.

परिषदेचे उपाध्यक्ष संदीप जगताप (सातारा) यांनी यावेळी आपले मत व्यक्त करत असताना समाज प्रबोधनाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी वेगवेगळ्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी कसा संपर्क ठेवावा, याविषयी मार्गदर्शन करत कार्यकर्ता ताठ मानेने उभा राहिला तरच समाज जागृत होईल, असे म्हटले.

माजी अप्पर जिल्हाधिकारी के. सी. कारकर हे यावेळी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी कार्यकर्त्यांनी एक पंचसूत्री ठरवावी आणि त्या पंचसूत्रीचे पालन करून समाजामध्ये चांगली प्रतिमा निर्माण करणारे कार्यकर्ते तयार करावेत, असे प्रतिपादन केले. तर यावेळी प्रा. महादेव घुले यांनी वेळ देणारे कार्यकर्ते चळवळीत आले तर चळवळ यशस्वी होते, असे सांगितले.

सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री घुगे सर यांनी देशात लोकांमध्ये पसरत चाललेला अनुत्साह थांबवण्यासाठी कार्यकर्त्यांनी जनतेमध्ये जावे, असे म्हटले. यावेळी अनेक वक्त्यांचे छोटे खाणी विचार देखील ऐकून घेण्यात आले. पुणे विभागातील सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि पुणे या पाच जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा हा मेळावा यशस्वी करण्यासाठी परिषदेचे कोषाध्यक्ष शिवाजीराव खेडकर यांनी मेहनत घेतली. त्यांना तुषार कुटे, अवि देवकर यांच्यासह इतरांनी मदत केली. पाचही जिल्ह्याच्या प्रतिनिधींनी या मेळाव्याला हजेरी लावली. पुण्यातील एक उत्कृष्ट कार्यक्रम या निमित्ताने पार पडला.मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी श्री. गणेश सातव यांनी सूत्रसंचालन चांगल्या पद्धतीने पार पाडले. तर आभार प्रदर्शन सचिन थोरात यांनी केले. राष्ट्रगीता नंतर मेळाव्याची सांगता झाली.

# तळणी गावात अवैध धंद्यांना ऊत तात्काळ कारवाई करा - मागणी

तळणी (प्रतिनिधी)

मंठा तालुक्यातील तळणी गावातील नागरिकांनी गावात वाढत चाललेल्या अवैध धंद्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे. या संदर्भात ग्राहकरक्षक समिती जालना जिल्हाध्यक्ष कैलास सिताराम पवार,तसेच विष्णू भाऊराव सरकटे व पंढरी लक्ष्मण हानवते यांनी मा. पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी आणि परतुर-मंठा विधानसभाचे आमदार श्री. बबनराव लोणीकर यांना ता.२६ रोजी निवेदन दिले आहे.

तळणी व परिसरात मागील काही महिन्यांपासून अवैध धंद्यांना मोठ्या प्रमाणावर ऊत आला आहे. गावातील तरुणाई, विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांचे जीवन धोक्यात आले असून कायदा आणि सुव्यवस्थेला गंभीर तडा पोहोचत आहे.विशेष करून वरली मटका जुगार ,ऑनलाईन व ऑफलाईन चक्री (जुगार) ,गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची बेकायदेशीर विक्री , पत्याचे क्लब व अन्य समाजविघातक धंदे राजरोस सुरू आहेत.या अवैध धंद्यांमुळे तरुणाई जुगार, दारू, गुटख्याच्या व्यसनात अडकून कुटुंब उद्ध्वस्त होत आहे. चोरी, भांडणे, घरगुती कलह आणि गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे. शेतकरी आणि कामगार वर्ग व्यसनाधीन होत आहेत. समाजातील शांतता व बंधुता धोक्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी मागणी केली आहे की, तळणी व परिसरातील सर्व अवैध धंद्यांवर तात्काळ छापेमारी करून संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. भविष्यात पुन्हा असे धंदे सुरू होऊ नयेत यासाठी गावात व परिसरात नियमित गस्त वाढवून कायदा व सुव्यवस्था काटेकोरपणे अंमलात आणावी.अवैध धंद्यांना स्थानिक पाठबळ मिळत असल्याने बीट जमादार, जो अनेक वर्षे तळणी येथे कार्यरत आहे, त्यांची तात्काळ बदली करण्यात यावी.गावातील नागरिकांचे जीवन सुरक्षित व व्यसनमुक्त व्हावे यासाठी पोलिसांनी विशेष मोहिम राबवावी.निवेदनाद्वारे नागरिकांनी आश्वासन दिले आहे की, पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई केली तर गावातील अवैध धंद्यांपासून नागरिक मुक्त होतील आणि गावामध्ये शांतता कायम राहील.



**पाटोदा - नायगाव येथील दिपक बारीकराव वाघुले यांचे अपघाती दु:खद निधन झाले. त्याच्या कुटुंबियांची भेट घेऊन तेजस ग्रुपच्या वतीने दिपकच्या दोन्ही मुलांच्या नावे तेजस अर्बन बँकेत १० हजारची फिक्स डिपॉजिट करून बॉण्ड देतांना जि. प. सदस्य ड प्रकाशदादा कवठेकर,सरपंच संदीप कवठेकर, सरपंच सय्यद शायद सर,पावनराजे भोसले, प्रदीप वाघुले, माहेमूद पठाण, सोनू वनवे, बंडू वाघुले, रिजवान पठाण, सचिन सातपुते,कल्याण औटे,जुबेर पठाण, छोटू बेग,अन्वर शेख, हजर होते.**



**माजलगाव - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने पत्रकार रविंद्र राऊत यांची कन्या कु.धनश्री हिचा एम.बी.एस.एस.ला पात्र ठरल्याबद्दल सन्मान करताना प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया, सचिव प्रा.सुदर्शन स्वामी, सामाजिक कार्यकर्ते राजेश थोरात, रविंद्र राऊत, संतोषकुमार जेथलिया, भगीरथ तोडकरी.**



**माजलगाव - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने पत्रकार भगीरथ तोडकरी यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया,सचिव प्रा.सुदर्शन स्वामी, रविंद्र राऊत, सुभाष नाकलगावकर, संतोषकुमार जेथलिया.**

# धनगर पिंपरीच्या शेतात बैलांचा सन्मान!

अंबड (प्रतिनिधी)

अंबड :जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात असलेल्या धनगर पिंपरी गावात यंदाचा बैलपोळा सण मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा झाला. वर्षभर शेतात राबून, शेतकऱ्यांचा खरा सोबती असलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गावकरी मोठ्या संख्येने एकत्र आले होते.

सकाळपासूनच गावात एक वेगळीच लगबग सुरू होती. शेतकऱ्यांनी आपल्या लाडक्या बैलांना स्वच्छ अंघोळ घालून, त्यांना सजवले. कुणी बैलांची शिंगे रंगवली, कुणी गळ्यात फुलांच्या माळा घातल्या, तर कुणी नक्षीदार झुली घालून बैलांना आकर्षक रूप दिले.

या अनोख्या सोहळ्याचे खास आकर्षण ठरले, मारुती मंदिरासमोरील पारंपरिक पूजा. सर्व बैलजोड्यांना एकत्र आणून, शेतकऱ्यांनी आपल्या पत्नीसोबत त्यांची मनोभावे पूजा केली. यावेळी त्यांना गोड पुरणपोळीचा नैवेद्य भरवून, त्यांच्या कष्टाबद्दल आभार मानले.

हा सण म्हणजे केवळ बैलांप्रती आदर व्यक्त



करणे नाही, तर शेती आणि निसर्गाचे अतूट नाते अधिक दृढ करणारा एक पवित्र सोहळा आहे. धनगर पिंपरी गावातील प्रत्येक शेतकऱ्याने, त्यांच्या मूक मित्राचा गौरव करत, आपली संस्कृती आणि परंपरा मोठ्या दिमाखात जपली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# बीड जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत आगामी काळात दि. २७ ऑगस्ट २०२५ रोजी श्रीगणेशोत्सव स्थापना दि.०६ सप्टेंबर २०२५ रोजी विसर्जन मिरवणूक, दि. ५ सप्टेंबर २०२५ रोजी ईद-ए मिलाद मिरवणुक असून तसेच राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. ०९ सप्टेंबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# एम. श्री शाळा पाली येथे इको-फ्रेंडली गणेश मूर्ती स्पर्धा उत्साहात संपन्न

बीड (प्रतिनिधी)

शहराजवळील पी. एम. श्री माध्यमिक शाळा, पाली येथे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबद्दल जनजागृती व्हावी या उद्देशाने इको-फ्रेंडली गणेश मूर्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा मुख्याध्यापक मु. अ. लाड सर व श्रीमती मनीषा जाधव मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी नैसर्गिक साहित्याचा वापर करून आकर्षक आणि पर्यावरणस्नेही गणपती मूर्ती साकारल्या. स्पर्धेद्वारे शाडू मातीचा वापर करा, निसर्ग वाचवा असा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. कार्यक्रमावेळी लाड सर व जाधव मॅडम यांनी पर्यावरणपूरक गणपती मूर्तींची गरज व उपयुक्तता स्पष्ट करत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन



केले. त्यांनी सांगितले की, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीमुळे जलप्रदूषण वाढते, तर शाडू मातीच्या मूर्ती पाण्यात सहज विरघळतात व निसर्गासाठी सुरक्षित असतात.

या उपक्रमाला शाळेतील शिक्षकवृंदांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी तळेकर सर, आघाव सर, राठोड सर, पायके सर, डोंगर सर, साळुंखे सर, काब्दे मॅडम, मुंडे मॅडम, म्हेत्रे मॅडम, हंगे मॅडम, सांगळे मॅडम, वाकचौरे मॅडम, खाडे मॅडम, मुळे मॅडम, जगताप मॅडम, सवई मॅडम, जाधव मॅडम व राठोड सर आदी मान्यवर उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या कला कौशल्यासोबतच पर्यावरण संवर्धनाचे भान जपणारा हा उपक्रम सर्व स्तरातून कौतुकास पात्र ठरत आहे.

# कै. दत्तासाहेब देशमुख विद्यालय, घनसावंगी येथे भगवान श्री चक्रधर स्वामी अवतरण दिन साजरा

घनसांगी (प्रतिनिधी)

मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या कै. दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, घनसावंगी येथे भगवान श्री चक्रधर स्वामी यांचा अवतरण दिन मोठ्या उत्साहात व अध्यात्मिक वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक श्री. केशव अटकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भगवान श्री चक्रधर स्वामी यांच्या जीवनकार्याची सखोल ओळख करून दिली. त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, श्री चक्रधर स्वामी यांनी वैदिक चतुर्वर्ण व्यवस्था नाकारून जात, धर्म आणि अवास्तव वाढलेले महत्त्व कमी करत भक्ती आणि ज्ञानाचा समन्वय साधून एक नवीन आध्यात्मिक मार्ग समाजाला दिला.मुख्याध्यापक अटकर यांनी असेही सांगितले की, अहिंसा, ब्रह्मचर्य, वैराग्य आणि भक्ती या चार तत्वांवर आधारित जीवनशैलीचा प्रसार श्री चक्रधर स्वामी यांनी केला असून, त्यांच्या शिकवणुकीचा समाजावर मोठा प्रभाव आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री. गीताराम शिंदे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. विष्णू गणकवार उपस्थित होते. कार्यक्रमात श्री. राजेंद्र मोरे यांनी देखील विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन



केले.या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक के. डी. खोजे, संभाजी शिंदे,संतोष लिंगणवाड,मंजूर सय्यद, जगन्नाथ जाधव, विनोद गवळी, संतोष घायाळ,मोताळे सर, तोडकर सर,श्रीमती वंदना वाघमारे,श्रीमती वंदना सपकाळ, श्रीमती शहनाज पठाण,श्रीमती हिरा टेकाळे,श्रीमती शबनम पठाण,शंकर राठोड,विठ्ठल सोमवारे,त्रंबक लोंढे,भुतेकर सर, भीमाशंकर वाघुंडे,अरुण नाटकर,नागनाथ गोंडगिरे, पाराजी जवळकर,रावसाहेब साळवे आणि कृष्णा भापकर यांची उपस्थिती लाभली होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शामल कांगणे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री बजरंग मोरे यांनी मानले.हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या मनामध्ये भक्ती, नीतीमूल्ये आणि अध्यात्मिक विचारांची बीजे पेरणारा ठरला.

# निवडुंगवाडी येथे हभप आप्पासाहेब चौरे महाराज यांचे कीर्तन संपन्न


बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील निवडंगवाडी येथे चालत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये सहाव्या दिवसाची कीर्तन सेवा हभप आप्पासाहेब चौरे महाराज श्रीक्षेत्र चोंडी तालुका धारूर यांनी केली. निवडुंगवाडी येथे सुरू असलेल्या सप्ताहात महाराजांनी प्रारब्ध क्रियामान या अभंगावर सविस्तर असे आध्यात्मिक विवेचन केले. यावेळी महाराजांनी क्रमाचे प्रकार सांगितले. संचितावर माणसाचे प्रारब्ध ठरते. पूर्वसंचित चांगले असेल तर प्रारब्ध चांगले ठरते कर्माची गती फार कठीण आहे.कर्मांने राम वनवासास गेला राजा दशरथ पुत्रांच्या मुळे मृत्युमुखी पडला. कर्माचा परिणाम जगाच्या बापाला आणि मालकाला भोगाव लागलेला आहे.पण भक्त आणि संत याला ते अपवाद आहे. यासाठी महाराजांनी भक्त बिभीषण आणि कृष्णाचा भक्त सुदाम्या यांची उदाहरणे देऊन उपस्थितांना मंत्रमुग्ध करून सोडले.यावेळी गावातील महिला पुरुष मंडळी, तरुण



मंडळी तसेच डोईफोडवाडी सानपवाडी सोनपेठ दहिफळ वडमाऊली व जैताळवाडी येथील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशी माहिती डोईफोडवाडी निवडुंग वाडीचे माजी सरपंच प्रा. तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी दिली.

# खराब खिचडीची तक्रार करणाऱ्या पत्रकाराला मुख्याध्यापकांनी अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप




अंबड (प्रतिनिधी)

धनगर पिंपरी, येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी शाळेत दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराबाबत गंभीर तक्रार केली आहे. पालकांच्या म्हणण्यानुसार, शाळेत दिल्या जाणाऱ्या खिचडीमध्ये मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आहे. या तक्रारीनंतर एका पत्रकाराने शाळेत जाऊन माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, मुख्याध्यापक घनश्याम जाधव यांनी त्यांचा अपमान केला, असा आरोप पत्रकाराने केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धनगर पिंपरी येथील जिल्हा परिषद शाळेत काही दिवसांपासून विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या खिचडीची गुणवत्ता खालावल्याची चर्चा होती. अनेक पालकांनी एकत्र येत याबाबत शाळेकडे तक्रार केली. पालकांच्या तक्रारीची सत्यता पडताळण्यासाठी एक पत्रकार शाळेत गेले. पत्रकार पोषण आहार सुरू असतानाच माहिती घेत होते. यावेळी, मुख्याध्यापक जाधव यांनी त्यांना अपमानास्पद वागणूक दिली आणि त्यांचे काम थांबवण्याचा प्रयत्न केला, असे पत्रकाराने सांगितले.

या घटनेमुळे शाळेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्नावर माहिती घेण्यासाठी गेलेल्या पत्रकाराला अशाप्रकारे वागणूक देणे कितपत योग्य आहे, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

मुख्याध्यापकांच्या वर्तनाबद्दल ग्रामपंचायतीचा ठराव

दरम्यान, शाळेच्या मुख्याध्यापकांच्या विरोधात केवळ पोषण आहाराच्या तक्रारी नाहीत, तर त्यांच्या एकंदर वर्तनाबाबतही ग्रामपंचायतीने गंभीर दखल घेतली आहे. ग्रामपंचायतीने नुकताच एक ठराव मंजूर केला आहे. या ठरावानुसार, मुख्याध्यापक जाधव यांचे वर्तन पालकांशी आणि गावातील लोकांशी योग्य नसून, ते अरेरावीची भाषा वापरतात. त्यांच्या या वर्तनामुळे शाळेतील शैक्षणिक वातावरणावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे, विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. या सर्व बाबींचा विचार करून, ग्रामपंचायतीने मुख्याध्यापकांची तातडीने बदली करावी अशी मागणी ठरावाद्वारे केली आहे.

शालेय पोषण आहार योजना ही विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेत कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असे शासनाने वारंवार स्पष्ट केले आहे. त्यामुळे, या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी पालक आणि स्थानिक नागरिकांनी केली आहे.

मुख्याध्यापक जाधव यांच्या वर्तनाबाबत शिक्षण विभागाकडे तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचे पत्रकाराने सांगितले आहे. शिक्षण विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तातडीने चौकशी करावी आणि दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




जाहिरातदारांना विनम्र आवाहन...!

दै.समर्थ राजयोग राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५

स.न.वि.वि.

मागील ५ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील 'दै.समर्थ राजयोग' चा ६ वा वर्धापन दिन शुक्रवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठवळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही 'वर्धापन दिन विशेषांक २०२५' चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी

गुगल पे/फोन पे नंबर 9822628521
दै.समर्थ राजयोग
बँक : बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

जाहिरात दरपत्रक

| अ.क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/- |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/- |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/- |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/- |

₹5000/- ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!

जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521
दै.समर्थ राजयोग
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वाचकांना विनम्र आवाहन...!

दै.समर्थ राजयोग राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५

रोखठोक प्रतिक्रिया पाठवण्याबाबत

दैनिक समर्थ राजयोग या शासनमान्य वृत्तपत्राचा शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी 6 वा वर्धापन दिन होत आहे. या निमित्त प्रकाशित होणाऱ्या विशेष अंकामध्ये आपण या वृत्तपत्राबद्दल आपले आलेले अनुभव, परखड मत व्यक्त करू शकता.

आपणास विनम्र विनंती आहे की, आपण कमी शब्दात आशय पूर्ण प्रतिक्रिया तात्काळ व्हाट्सअप नंबर 98 22 62 85 21 यावर आपल्या पासपोर्ट फोटोसह पाठवावी...ही विनम्र विनंती...

आपलाच
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521
दै.समर्थ राजयोग
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

सस्नेह निमंत्रण

दै.समर्थ राजयोग राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
6 वा वर्धापन दिन..!

शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी शिक्षक दिनी दैनिक समर्थ राजयोग या वृत्तपत्राचा 6 वा वर्धापन दिन आहे.

या वर्धापन दिन सोहळ्यासाठी आपण खास निमंत्रित आहात.

शुक्रवार, दिनांक 5 सप्टेंबर 2025
वेळ - सकाळी 11 ते सायंकाळी 6 पर्यंत....

स्थळ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड

टीप - स्नेही जणांना विनंती आहे की, कृपया वर्धापन दिनानिमित्त शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ स्वीकारले जाणार नाहीत. या ऐवजी इच्छेनुसार शैक्षणिक साहित्य आणावे. आपले हे शैक्षणिक साहित्य गरजवंत होतकरू विद्यार्थ्यांना दिले जाईल... धन्यवाद...

आपलाच
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521

# पुण्याचे डॉ. आदित्य पतकराव यांना अमेरिका येथे होणाऱ्या विश्व डेंटल समिट चे निमंत्रण

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

वर्ल्ड रेकॉर्ड धारक, डेंटल ऑस्कर विजेते तसेच ब्रिटिश पार्लियामेंटरी अवॉर्डी म्हणून सन्मानित अंबाजोगाईचे भुमी पुत्र तथा पुणे येथील नामवंत आंतरराष्ट्रीय दंतचिकित्सक डॉ. आदित्य पतकराव यांना आगामी नोव्हेंबर २०२५ मध्ये न्यूयॉर्क (अमेरिका) येथे होणाऱ्या विश्व डेंटल समिटमध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण आले आहे.या आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. आदित्य पतकराव आपल्या टीमने विकसित केलेले डेंटल पेटंट जगभरातील दंतचिकित्सक व व्यावसायिकांसमोर सादर करणार आहेत. तसेच भारतात सातत्याने वाढणाऱ्या डेंटल टुरिझमला चालना देण्याचे कार्यही ते करणार आहेत.

या बैठकीत डॉ. पतकराव म्हणाले की, मेक इन इंडिया अंतर्गत विकसित झालेले आमचे डेंटल पेटंट जगभरातील दंतचिकित्सकांसमोर सादर करणे माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. भारतात उपचारासाठी येणाऱ्या परदेशी रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे हे माझे ध्येय आहे.

समिटनंतर नासा टूर एज्युकेशनल प्रोजेक्ट डायरेक्टर या नात्याने डॉ. पतकराव अमेरिकेतील अलाबामा राज्यातील हन्सविले येथील नासा स्पेस सेंटरला भेट देणार आहेत. त्यानंतर ते वॉशिंग्टन डी.सी. येथील एका शाळेत जाऊन तेथील शैक्षणिक प्रणालीचा अभ्यास दौरा करणार आहेत.



अंबाजोगाईकरांसाठी ही अभिमानाची बाब आहे.

# पोलिसांच्या आशीर्वादाने वाळू माफियांचा उच्छाद !

चार टेम्पो पकडूनही हात ओले करून सोडले,तळणीत संतापाची लाट

तळणी (प्रतिनिधी)

मंठा तालुक्यातील तळणी परिसरात अवैध वाळु माफियांनी पुन्हा धुमाकूळ घातला आहे. विशेष म्हणजे, पोलिसांच्या गस्तीवर असतानाही अवैध वाळुने भरलेले चार टेम्पो पकडले गेले. मात्र संबंधित पोलीस कर्मचारी यांनी कोणतीही कारवाई न करता चालकांसोबत आर्थिक व्यवहार करून हे टेम्पो सोडून दिल्याची चर्चा नागरीकांत रंगली आहे.

वाढती मस्ती, घटता कायदा

तळणी शिवारातील टाकळखोपा व वाघाळा परिसरात वाळु माफियांनी इतका जोर धरला आहे की, या भागात तहसिलदारांवर देखील अनेकवेळा हल्ले झाले आहेत. तरीही, पोलिस प्रशासनाकडून अभय मिळाल्याने माफियांची मस्ती दिवसेंदिवस वाढत आहे.

दि. २६ रात्री २ ते ३ च्या सुमारास गस्तीवर असलेल्या पोलीसांनी चार टेम्पो थांबवून वाळु जप्त करण्याऐवजी चालकांसोबत 'सेटलमेंट' करून सोडून दिल्याने कायद्याची थट्टा झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी गेल्या काही महिन्यांपासून जिल्ह्यातील सर्व अवैध धंदे बंद करण्यासाठी ठाम सूचना दिल्या आहेत. मात्र मंठा पोलिस ठाण्याच्या हद्दीतच अशा गैरव्यवहारांना पोलीसच हातभार लावत असल्याने प्रशासनाची प्रतिष्ठा धोक्यात आली आहे.

नागरिकांची मागणी

या घटनेमुळे तळणी परिसरात संतापाची लाट पसरली असून, स्थानिक नागरिकांनी पोलिसांच्या सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे केली आहे.

# लाल बावटा बांधकाम कामगार संघटनेचे १ तालुका अधिवेशन मोठ्या उत्साहात संपन्न

## तालुका अध्यक्षपदी कॉ.ओम पुरी व तालुका सचिवपदी कॉ.पप्पू आजबे यांची निवड

वडवणी (प्रतिनिधी)

बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटना (लाल बावटा) ही बांधकाम कामगारांसाठी काम करणारी लढाऊ संघटना आहे. या संघटनेच वडवणी तालुक्यात चांगल्या प्रकारे काम आहे. या संघटनेचे पहिले वडवणी तालुका अधिवेशन देवडी येथे पार पडले.

या अधिवेशनाचे उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व बीड जिल्हाध्यक्ष कॉ.प्रा.बी.जी खाडे सर यांनी कामगार चळवळ त्याचा इतिहास व कामगार चळवळीतील लाल बावटा संघटनेच योगदान व कामगारांच्या वेगवेगळ्या प्रश्नांवर व प्रामुख्याने कामगार चळवळ व संघटना बांधनी आणि बांधकाम कामगारांना ९० दिवस कामच्या प्रमाणपत्र संदर्भात मार्गदर्शन केले. पुढे बोलताना त्यांनी कामगार मंडळाच्या कार्यालयीन दिरंगाई वर कठोर प्रहार केला.या अधिवेशनाचे नियोजन जिल्हा उपाध्यक्ष कॉ.ओम पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. कॉ.ओम पुरी यांनी या अधिवेशनाची प्रस्तावना केली आणि मागील तीन वर्षांचा संघटनेचा कार्यात्मक अहवाल अधिवेशनासमोर ठेवला व तो गुणदोषसह एकमताने मंजूर करण्यात आला. या अधिवेशनात पुढील ठराव मंजूर करण्यात आले.

१) बांधकाम कामगारांच्या पाल्यांच्या शिष्यवृत्ती मध्ये वाढ करावी. २) बांधकाम कामगारांच्या योजना सेवा हमी कायदा लागू करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी.

३) प्रलंबित नोंदणी, नूतनीकरण, लाभाचे अर्ज तातडीने मंजूर करावी व त्यासाठी लढा मजबूत करावा ४) मागिल वर्षी ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र ग्रामपंचायत अधिकारी यांनी द्यावे. असे विविध ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.

या अधिवेशनामध्ये नवीन तालुका कमिटी व पदाधिकारी निवडीचा एकमताने करण्यात आली. या मध्ये नवीन यामध्ये वडवणी तालुका अध्यक्षपदी कॉ.ओम पुरी तर तालुका सचिवपदी कॉ.पप्पू आजबे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी गणेश चौधरी उमेश काळे, सहसचिवपदी उत्तरेश्वर सवासे, विलास थोरात, कोषाध्यक्षपदी लक्ष्मण गिलबीले, तालुका कमिटी सदस्य म्हणून भागवत झाटे, नितीन भैरट, शरद फरताडे, सोनाजी गोंडे, रमेश मोरे, गोरख चांभारे, हरिदास गिरी, राजेभाऊ हातागळे, प्रविण शिंदे, अशोक साबळे, अंगद राठोड, करण अंडील,शहाजी ठोंबरे, अन्सार शेख, यशवंत अनभूले, व तीन जागा राखीव ठेवण्यात आल्या.




नवनिर्वाचित तालुका कमिटीला जिल्हा अध्यक्ष कॉ.प्रा.बी.जी.खाडे सरांनी शुभेच्छा दिल्या व निवड झालेल्या सर्व कमिटीचा सत्कार केला.या अधिवेशनाला शुभेच्छा देण्यासाठी विद्यार्थी चळवळीतील नेते एसएफआय संघटनेचे राज्य सहसचिव कॉ.लहू खारगे यांनी शुभेच्छा दिल्या व मनोगत व्यक्त केले.नवनिर्वाचीत सचिव कॉ.पप्पू आजबे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की मी या जबाबदारीला पुर्णपणे न्याय देईल. संघनावाढीसाठी सातत्याने प्रयत्न करेल. नवनिर्वाचीत ता.अध्यक्ष कॉ.ओम पुरी यांनी अध्यक्षीय समारोप करताना कामगारांची एकजूट करून येणाऱ्या काळात संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तालुका कमिटी प्रयत्नशील राहिल व कामगारांची चळवळ टिकली पाहिजे, वाढली पाहिजे, मजबूत झाली पाहिजे. जे काम चळवळ करू शकते तेच काम कोणी करू शकत नाही. सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे । या संचाच्या काव्याचा संदर्भ देत चळवळीच महत्व सांगितले आणि माफक अपेक्षा व्यक्त केली की संघटना वाढीसाठी तालुका कमिटीला सहकार्य करतील.अधिवेशनासाठी आलेल्या सर्व कामगारांचे आभार मानले. हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी अन्सर शेख, अविनाश लोंढे, जावेद शेख, जगन्नाथ लोंढे यांनी अथक परिश्रम घेतले.

# आमदार सुरेश धस यांच्या भगीरथ प्रत्यनाने जलसंजीवनी

## सिंदफणा नदीवरील दोन बंधाऱ्याचा विस्तार व बॅरेजमध्ये रूपांतर करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी..

श्री गणरायाच्या आगमनानिमित्त आ.धस यांच्याकडुन बळीराजाला गिफ्ट

मानूर (प्रतिनिधी)

शिरूर कासार तालुक्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव मायंबा आणि ब्रम्हनाथ येळंब येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचा विस्तार करून त्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर करण्याच्या मागणीला अखेर शासनाने मान्यता दिली आहे. २६ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या महत्वाकांक्षी योजनेला हिरवा कंदील देण्यात आला असून या निर्णयामागे आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.

या निर्णयामुळे शेतकऱ्याच्या जीवनात जलसंजीवनी येणार असून आमदार सुरेश धस यांच्या भगीरथ प्रयत्नाने सिंदफणा नदीवरील दोन कोल्हापुरी बंधाऱ्यास मॅरेज मध्ये रूपांतर करण्यासाठी मंजुरी मिळाली असून आमदार सुरेश धस यांनी श्री



गणरायाच्या आगमनाचे बळीराजाला एक गिफ्ट दिलं असल्याने आनंदो त्सव साजरा केला जात आहे.

यापूर्वी १ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रकल्पाच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली होती. त्यानंतर प्रशासकीय मान्यतेसाठी आमदार सुरेश धस यांनी राज्य शासनाच्या पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळत मंत्रिमंडळ बैठकीत अंतिम निर्णय घेण्यात आला आहे.

सिंदफणा ही नदी हंगामी वाहणारी नदी असल्यामुळे १५ ऑक्टोबर नंतर बऱ्याच वेळा प्रवाहित नसते त्यामुळे बंधाऱ्यात पाणीसाठा होत नाहीत तसेच मोठ्या संख्येने असलेल्या अर्ध्या मीटरचे दरवाजे बसवल्यानंतर ऑक्टोबर,नोव्हेंबर मध्ये अवकाळी पावसामुळे नदीला पूर आल्यास दरवाजे वेळेवर काढता न आल्याने पूर पातळी वाहून तीरावरील माती भराव वाहून जाऊन बंधाऱ्यांचे फार मोठे नुकसान होते. याबाबत आमदार सुरेश धस यांच्याकडे वेळोवेळी ग्रामस्थांनी मागणी केली असता या मागणीनुसार पर्यायी मार्ग म्हणून सदर कोल्हापुरी बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रूपांतर करावे अशी मागणी केली होती या मागणी ला आज मंत्रिमंडळात मान्यता मिळाली आहे.

निमगाव मायंबा, ब्रह्मनाथ येळंब व आसपासच्या गावांचे शाश्वत पाण्यामुळे शेकडो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन सिंचन क्षेत्र वाढणार आहे.पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल तसेच भूजलपातळी उंचावून संपूर्ण परिसरातील पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होऊन दुष्काळी भाग जलयुक्त होणार आहे. त्यामुळे शेतकरी व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले.

या ऐतिहासिक निर्णयाबद्दल आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री मा.ना. एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.अजितदादा पवार, जलसंपदा मंत्री मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह भाजप महायुती सरकारमधील सर्व मंत्रीमंडळाचे आभार मानले आहेत.आष्टी मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार सुरेश धस यांचे निमगाव मायंबा,ब्रह्मनाथ येळंब व आसपासच्या गावाच्या ग्रामस्थांनी आनंद उत्सव साजरा करत आभार मानले आहेत.



**नायगाव येथील दिपक (बारीकराव वाघुले )यांचे अपघाती दु:खद निधन झाले आहे. त्याच्या कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. व तेजस ग्रुप च्या वतीने दिपक च्या दोन्ही मुलांच्या नावे तेजस अर्बन बँकेत १० हजार ची फिक्स डिपॉजिट करून बॉण्ड देतांना मा. जि. प. सदस्य ड प्रकाशदादा कवठेकर,सरपंच श्री. संदीप कवठेकर, मा. सरपंच श्री. सय्यद शायद सर,श्री. पावनराजे भोसले, प्रदीप वाघुले, माहेमूद पठाण, सोनू वनवे, बंडू वाघुले, रिजवान पठाण, सचिन सातपुते,कल्याण औटे,जुबेर पठाण, छोटू बेग,अन्वर शेख, हजर होते**




## माजी सैनिकांना राजकीय आरक्षण द्यावे, जिल्हाधिकारी यांच्याकडे त्रिदल सैनिक सेवा संघाची मागणी

आष्टी (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य त्रिदल सैनिक सेवा संघाचे पदाधिकारी व सर्व तालुकाध्यक्ष यांनी बीडचे जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन देऊन माजी सैनिकांना राजकीय आरक्षण द्यावे अशी मागणी केली. महाराष्ट्र राज्यातील देशसेवा करून सेवानिवृत्त झालेल्या माजी सैनिकांना ग्रामपंचायतमध्ये एक सदस्य, पंचायत समितीमध्ये एक सदस्य, जिल्हा परिषदमध्ये एक सदस्य, नगर पालिकेमध्ये एक सदस्य, महानगर पालिकेमध्ये एक सदस्य, राज्यपाल नियुक्त आमदार मध्ये एक सदस्य, राज्यसभामध्ये एक सदस्य, लोकसभे मध्ये एक सदस्य, शिक्षक मतदार संघाप्रमाणे महाराष्ट्र राज्य सात विभागात सात सैनिक मतदार संघ तयार करून सात माजी सैनिकांना आमदार करण्यात यावे अशी मागणी राज्यातील सर्व सैनिक परिवार, शहीद परिवार यांच्या वतीने आहे. सैनिकांना देखील आपल्या गावामध्ये, आपल्या तालुक्यात, आपल्या जिल्ह्यात. आपल्या राज्यात, आपल्या देशात राजकारणाच्या माध्यमातून विकास करण्याची संधी आपण आरक्षण देऊन करावी असे महाराष्ट्रातील आजी - माजी सैनिक शहीद परिवार सैनिक परिवाराच्या वतीने मागणी आहे. आम्हा सैनिकांना राजकीय आरक्षण द्यावे अशी मागणी केली आहे. या निवेदनच्या मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडवणीस, महामहीम राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार, निवडणुक आयुक्त दिनेश वाघमारे, सैनिक कल्याण मंत्री ना. शंभुराजे देसाई यांना पाठवल्या आहेत. या निवेदनावर प्रदेशाध्यक्ष अंकुश खोटे, उपाध्यक्ष जमीर हैदरखान पठाण, सचिव झगडे हनुमान गोपीनाथ, सहसचिव बबन भोननाथ दहिफळे, कोषाध्यक्ष कैलास निवृत्ती पाखरे, सदस्य बी. गोरख बापुराव काळे, मनिष सर्जेराव नरोडे यांच्या सह्या आहेत.

# अंबाजोगाईत ब्राह्मण वधु-वर मेळाव्यास उत्स्फुर्त प्रतिसाद

## नोकरीपेक्षा कर्तृत्व, गुणवत्ता आणि निर्व्यसनी मुलासोबत सुखाचा संसार होवु शकतो - प्रवक्ते राम कुलकर्णी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

सामाजिक जीवन जगताना ब्राह्मण समाज वेगवेगळ्या संकटाला तोंड देत असला तरी गुणवत्ता आणि कर्तृत्वाच्या आधारावर सतत यश मिळत आले. मुलीचे लग्न करताना नोकरीला प्राधान्य देत असाल तरी कर्तृत्वाच्या आधारावर जो आयुष्य फुलवताना दिसतो त्या कुटुंबियातील संस्कार आणि निर्व्यसनी असे सद्गुण पाहुन देखील आयुष्याची गाठ बांधण्याचा विचार केला तर खर्या अर्थाने वैवाहिक संकट दुर होवु शकते असे प्रतिपादन पत्रकार राम कुलकर्णी यांनी केले तर समाज संघटन ज्यातुन वेगवेगळे प्रश्न मार्गी लावण्यास मदत होते. माझ्या राजकिय जीवनात केज मतदारसंघात ब्राह्मण समाजाचा मोठा वाटा असल्याचे भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडांनी सांगितले.

आखिल भारतीय पेशवा संघटना तथा स्थानिक शाखेच्या वतीने राज्यस्तरीय सातव्या वधु-वर मेळाव्याचे आयोजन खोलेश्वर महाविद्यालयात डॉ.हेडगेवार कक्षात करण्यात आले होते. व्यासपीठावर नगरसेवक डॉ.अतुल देशपांडे, संघटना संस्थापक अध्यक्ष सचिन वाडे पाटील, श्री लक्ष्मीकांत दडके, मोरेश्वर मार्डीकर, विजय काजे, संतोष जोशी, दिपक कासंडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. परशुरामाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सौ.आरती कुलकर्णीच्या स्वागत गीताने प्रारंभ झाला. मान्यवरांचा सत्कार झाल्यानंतर मोरेश्वर मार्डीकर यांनी प्रास्ताविकद्वारे संघटनेच्या माध्यमातुन विविध सामाजिक उपक्रम राज्यभर घेत असल्याचे सांगितले. प्रसंगी बोलताना डॉ.अतुल देशपांडे यांनी सामाजिक प्रश्नावर भाष्य करताना समाजाने आता अशा वधु-वर मेळाव्यातुन आदर्श घेतले पाहिजेत असं ते म्हणाले. सचिन वाडे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी परशुराम विकास आर्थिक महामंडळ मंजुर करत न्याय दिला. यासाठी अखिल भारतीय पेशवा संघटनेने वर्षानुवर्षे लढा दिल्याचे त्यांनी सांगितले. वधु-वर मेळाव्याच्या माध्यमातुन सामाजिक ऐक्य आणि प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत असल्याचे ते म्हणाले. आपल्या भाषणात बोलताना राम कुलकर्णींनी समाजाला मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यामुळे आर्थिक विकास महामंडळ मिळाले.



फडणवीस बहुजनांचे कैवारी असुन अठरापगड जातीधर्माच्या कल्याणासाठी अहोरात्र परिश्रम घेतात. विविध महामंडळाला निधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सरकारी पातळीवर सुरू असुन परशुराम महामंडळालाच निधी दिल्यानंतर अनेकांचे पोट दुखायला लागले. याचाच अर्थ समाज अशा टिकेचा आणि द्वेषाचा नेहमीच सामना करत आला पण कर्तृत्वाच्या आधारावर गुणवत्ता मार्गाने आपण अनादिकाळापासुन पुढे जातो हे नक्की. समाजात वधु-वर मेळाव्याची अत्यंत गरज असुन मुलीचे लग्न करताना नोकरीचा मुलगा तोही पुणे-मुंबईत हा आग्रह खर्या अर्थाने पालकाने सोडला पाहिजे. कर्तृत्वाच्या आधारावर व्यापार असो किंवा विविध क्षेत्रात आता तरूण मुले आर्थिक समृद्धीकडे जावु लागले. कुटुंबियातले संस्कार आणि आर्थिक समृद्धी हा विचार सुद्धा आता मुलीच्या आई-वडिलांनी निश्चित करायला हवा. ग्रामीण भागात मिळणारा आनंद पुणे-मुंबईसारख्या शहरात निश्चित मिळत नसल्याचे ते म्हणाले. सचिन वाडे पाटील यांच्या संघटनात्मक कार्याचे त्यांनी कौतुक केले. समाजाच्या प्रश्नावर आपण सर्वतोपरी सहकार्य करत असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमात विविध जिल्ह्यातुन आलेल्या वधु-वरांची माता-पित्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे आभार संयोजक सुधीर धर्माधिकारी यांनी केले. सुत्रसंचालन सौ.अंजली देशपांडे यांनी केले. सौ.आरती कुलकर्णी सोनेसांगवीकर, सविता देशमुख, संजय देशपांडे, विवेक वालेकर, महेश राडकर, भास्कर देशपांडे, रजनी देशपांडे, अंजली देशपांडे, योगेश जोशी चिंचाळकर आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# जे.के. दादा जोंधळे यांना अकोला येथील सामाजिक पुरस्कार जाहीर !

धर्माबाद / अशोक पडोळे

येथील वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ सल्लागार तथा आंबेडकरी चळवळीचे प्रेरणास्त्रोत जे.के. दादा जोंधळे यांना अकोला जिल्हा कलावंत समितीच्या वतीने महाकवी वामनदादा कर्डक, स्वर सम्राट प्रल्हाद शिंदे,महाकवी प्रताप सिंग बोददे यांच्या संयुक्त जयंती उत्सवात सामाजिक व आंबेडकरी चळवळीच्या योगदानासंदर्भात प्रतिष्ठेचा पुरस्कार समितीकडून जाहीर झाला.

जे.के. दादा जोंधळे हे आंबेडकरी चळवळीचे धर्माबाद तालुक्यातील प्रेरणास्त्रोत मानल्या जाते. आंबेडकरी चळवळीतील कलावंतांना मोठ्या प्रमाणात त्यांनी आपल्या तालुक्यात बोलावून उत्तेजन दिले. आपली मुले घडवताना व संसारीक जबाबदारी पार पाडत असताना त्यांनी सामाजिक भान जोपासत आंबेडकरी चळवळीकडे गांभीर्याने लक्ष दिले. त्यांच्या ह्या कार्याची पोचपावती म्हणून अकोला जिल्हा कलावंत समितीच्या वतीने उपरोक्त पुरस्कार जाहीर झाला असून अकोला जिल्ह्यातील गायगांव (रेल्वे) तालुका बाळापूर येथे हा पुरस्कार ३० ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात येणार आहे.



उपरोक्त जिल्ह्याबाहेरील पुरस्कार मिळाल्यामुळे जे के दादा जोंधळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या आमेर अजमेर पठाणच्या कुटुंबियांना धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून प्रशासनाकडून चार लाखांची मदत

## युवक नेते अजय मुंडे, तहसीलदार यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या हस्ते कुटुंबीयांना मदतीचा धनादेश प्रदान

परळी (प्रतिनिधी)

परळी वैद्यनाथ तालुक्यातील पांगरी परिसरातील पुलाच्या कामावर असताना परळी शहरातील कामगार आमेर अजमेर पठाण या तरुणाचा पुराच्या पाण्यात वाहून जाऊन मृत्यू झाला होता; परळीचे आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून सदर तरुणाच्या कुटुंबीयांना आज प्रशासनाच्या वतीने चार लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे यांच्यासह परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते या चार लाखांच्या धनादेशाचे वितरण पठाण यांच्या वारसांकडे करण्यात आले.

धनंजय मुंडे यांनी आपत्ती व्यवस्थापन मधून मयत कामगाराच्या वारसांना आर्थिक साहाय्य करण्याचे निर्देश तहसीलदार तथा स्थानिक प्रशासनास दिले होते त्या अनुषंगाने ही मदत तातडीने करण्यात आली. याप्रसंगी युवक नेते अजय मुंडे, तहसीलदार व्यंकटेश मुंडे,



राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, माजी उपनगराध्यक्ष आयुब भाई पठाण, अजीज कच्ची, रवी मुळे, अल्ताफ पठाण, नय्युम शहा, राजू भाई, बद्दल भाई, स्थानिक चे तलाठी विष्णू गीते, खाजाभाई, जफर भाई, बकश भाई, अन्सारी सर यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# मादी खेकडे न पकडण्याचे नागरिकांना आवाहन

बीड ।प्रतिनिधी

पावसाळयात निसर्गात उपलब्ध असलेल्या गोडया पाण्यातील खेकडयांची तस्करी होत असल्याची तक्रार आपले सरकार पोर्टलवरुन कार्यालयास प्राप्त झाली आहे. पावसाळयात नदी, नाले, तलाव यामध्ये नैसर्गिकरित्या गोडया पाण्यातील खेकड्यांचे प्रजनन सुरु होते. काही व्यक्ती प्रत्यक्षात या खेकडयांची तस्करी करीत असल्याने खेकडयांचे प्रजनन पूर्ण करु देत नाहीत. नैसर्गीक वास्तव्यास असलेल्या खेकडयांना प्रजनन हंगामात पकडणे हे कृत्य योग्य नाही. जर अशा पध्दतीने खेकड्यांना प्रजनन हंगामात पकडल्यास नैसर्गीकरित्या खेकडयांना प्रजनन करु न दिल्यास खेकडयाच्या प्रजाती नष्ट होतील. त्यामुळे नदया, नाले, तलाव यामधील खेंकडयाची तस्करी होणे योग्य नाही.

त्यानुषंगाने खेकडयांची तस्करी न होता खेकड्यांना प्रजनन नैसर्गीक पध्दतीने करु देण्याबाबत आपण सर्वांनी जागृत राहणे आवश्यक आहे. त्यामुळे निसर्गाचा समतोल राहील. खेकडयांच्या प्रजनन हंगामात निसर्गात उपलब्ध असलेले अंडी अथवा पिल्ले धारण केलेल्या त्याच प्रमाणे मादी खेकडे पकडण्यास बंदी घालणे आवश्यक असल्याचे मत्स्य व्यवसाय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे नागरिकांना आवाहन केले आहे.

याबाबत अधिक माहितीसाठी मत्स्यव्यवसाय कार्यालय, पहिला मजला, दहीफळे इमारत, यशोदीप हॉटेलसमोर, बार्शी रोड, बीड -४३११२२ महाराष्ट्र फोन नंबर/फॅक्स (०२४४२) २२२७०९ मेल आयडी-खऊ-रलषलशशवळश्रीशवळषषारळश्र.लो पहिला मजला, दहिक शिदोरी कालावधी: -सी./ फॅक्स: (०२४४२) २२२७०१ या क्रमांकावर किंवा वरील कार्यालयाच्या पत्यावर संपर्क साधावा.

# चलो मुंबई- लढाई अंतिम टप्प्यात शांतता, शिस्त आणि अखंड एकजुटीचे दर्शन होणार

मुंबई ।प्रतिनिधी

मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गरजवंत मराठ्यांच्या न्याय हक्कासाठी आझाद मैदान मुंबई याठिकाणी शुक्रवार २९ ऑगस्ट २०२५ पासून उपोषण करणार आहेत. यापूर्वी झालेल्या ५८ मोर्चे, अंतरावलीतील एक ऐतिहासिक सभा आणि नवी मुंबई पर्यंतची अभूतपूर्व आरक्षण रॅली यामध्ये ज्याप्रकारे मराठा समाजाची शांतता, शिस्त आणि एकजुट बघायला मिळाली अगदी त्याचप्रकारे आत्ताही समाजबांधवांनी अंतरवाली सराटी ते मुंबई या महारॅलीत सहभागी होत असताना शांतता आणि शिस्तीत सहभागी होत असताना सतर्क राहण्याचा इशारा देखील मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी सकल मराठा समाजास दिला आहे.

अंतरवाली सराटी ते मुंबई या महारॅलीचा मार्ग :- २७ ऑगस्ट २०२५- अंतरवाली सराटी- शहागड फाटा-साष्ट पिंपळगाव-आपेगाव (माऊलींचे) पैठण कमान-घोटण-शेवगाव- मिरी मका-पांढरी पूल-अहिल्यानगर बायपास-नेप्ती चौक-आळेफाटा-ओतूर-बनकर फाटा-शिवजन्मभुमी किल्ले शिवनेरी, जुन्नर येथे मुक्काम. २८ ऑगस्ट २०२५ -शिवाई देवीचे दर्शन- नारायणगाव -राजगुरुनगर-चाकण-तळेगाव-लोणावळा-पनवेल-वाशी-चेंबूर-आझाद मैदान, मुंबई मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील, गरजवंत मराठ्यांच्या न्याय हक्कांसाठी एकमेव पर्याय -राहुल ढेंबरे पाटील सकल मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी आत्मीयतेने आणि तळमळीने लढणारे खंबीर नेतृत्व मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या रूपाने मिळाल्याची प्रचितीच आतापर्यंतच्या आरक्षणाच्या लढाईत सर्वांना आलेली आहे. चलो मुंबई- आता माघार नाहीच असा नारा देत मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांनी गरजवंत मराठ्यांचा हा लढा अंतिम टप्प्यात आलेला असताना २७ ते २९ ऑगस्ट २०२५ मराठा समाज बांधवांच्या प्रवासात रस्त्यांच्या कडेला ठिकठिकाणी नाष्टा, पिण्याचे पाणी, जेवणाची व्यवस्था, नादुरुस्त वाहनांची मदत करण्यासाठी मराठा सेवक, गावांतील शिखर संस्था तसेच सर्वच समाजबांधव याचे सुयोग्य नियोजन करत असताना सर्वांनी आपापल्या सर्वोत्तम सामाजिक बांधिलकीचे दर्शन यातून दिले आहे. २९ ऑगस्ट जवळ येत आहे त्यामुळे काही ठराविक लोक, कुठलीही सामाजिक बांधीलकी न जपता केवळ मनोजदादा जरांगे पाटील आणि मराठा आरक्षण यावर स्वतःच्या प्रसिद्धीसाठी वायफळ तसेच द्वेष पसरविण्याचे काम तसेच सकल मराठा समाजाची एकी कशी भंग करता येईल अशी वक्तव्ये करणारांकडे लक्ष न देता या रॅलीतील सहभागी समाजबांधवांची प्रवासात गैरसोय होणार नाही याकडे लक्ष द्यावे, तसेच मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचाच आदेश अंतिम राहील, असे आवाहन प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे शिवप्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष राहुल ढेंबरे पाटीलयांनीकेलेआहे.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिन २ सप्टेंबर रोजी

बीड ।प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार दि. १ सप्टेंबर २०२५ रोजी जेष्ठ गौरीपुजन असल्याने मंगळवार दि. ०२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे.

अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

# अंबाजोगाई येथे सुसज्ज असे १ हजार १५० खाटांचे रुग्णालय उभारावे

## स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे काम दर्जेदार पद्धतीने करावे- उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई (प्रतिनिधी)

मराठवाड्यातील ग्रामीण भागासाठी वैद्यकीय शिक्षण व आरोग्यसेवा अधिक सक्षम व्हावी यासाठी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे १ हजार १५० खाटांचे सुसज्ज शासकीय रुग्णालय उभारण्यात यावे. तसेच स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे काम दर्जेदार पद्धतीने करावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाबाबत उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आज बैठक झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री.पवार बोलत होते.या बैठकीस वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वैद्यकीय



शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, संचालक डॉ. अजय चंदनवाले, अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, वित्त विभागाच्या सचिव (वित्तीय सुधारणा) शैला ए.,उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

देशातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय म्हणून ओळख असलेल्या अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे रूपांतर आदर्श शासकीय संस्थेमध्ये करावे असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, अंबाजोगाई येथील वैद्यकीय महाविद्यालयासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. महाविद्यालयाच्या आधीच सुरू असलेल्या व पूर्ण झालेल्या कामांचा समावेश करून नवीन मास्टर प्लॅन तयार करावा. नवीन रुग्णालयात आधुनिक सुविधा, सुपर स्पेशालिटी सेवा यांचा समावेश असावा, उत्कृष्ट सुविधा असाव्यात. मराठवाड्यासाठी हे महाविद्यालय महत्वाचे असून येथे येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी आहे. तसेच येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याचा प्रस्ताव सादर करावा. काम लवकरात लवकर पूर्ण करावे, सध्या अस्तित्वातील इमारतींचा नियोजनपूर्वक वापर करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले की, अंबाजोगाईतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा दर्जा उंचावण्यासाठी कार्यवाही वेगाने करावी. चांगला आराखडा तयार करून, कार्यवाही ठोस पद्धतीने व्हावी. मराठवाडा विभागातील लोकसंख्येसाठी ही सुविधा म्हणजे एक मोठा दिलासा ठरणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी नवीन संधी मिळणार




# ग्रामरोजगार सहाय्यक केशव बारगजे यांचे आमरण उपोषण सुरू

शिरूर (प्रतिनिधी)

तालुक्यातील तरडगव्हाण येथील ग्रामसेविकेच्या पतीच्या मानसिक त्रासाला कंटाळून ग्रामरोजगार सहाय्यक केशव बारगजे यांनी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात बारगजे यांनी आपण २००८ पासून तरडगव्हाण ग्रामपंचायत मध्ये ग्रामरोजगार सहाय्यक म्हणून काम पाहत असून येथील ग्रामसेविकेचे पती विवेक एकनाथ बारगजे जि.प.शिक्षक बालानाईक तांडा ता.घनसांगवी जिल्हा जालना हे माझा कसलाही दोष नसताना मानसिक त्रास देत आहेत.शिवाय एम.आर.इ.जी.एस चे मूळ संचिका अभिलेख कुशल रेकॉर्ड सांभाळण्याची जबाबदारी हि ग्रामरोजगार सेवकांची आहे.परंतु विवेक बारगजे हे पॅनलप्रमुख व ग्रामसेविका यांचे पती असल्यामुळे आपल्याला त्रास होत असून एम.आर.ई.जी.एस चा कारभार स्वत पाहत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.तसेच १८ सप्टेंबर २०२३ रोजी दुय्यम रोजगार सेवक कमी करण्याचा शासन निर्णय झाला त्यानुसार सदरील पद रिक्त केले परंतु एम.आय.एस वरील नाव कमी करण्यात आले नाही.या संदर्भात आम्ही जिल्हास्तरावर उपोषण केले परंतु आश्वासन देऊन आमचे उपोषण सोडविण्यात आले.वेळोवेळी आम्ही निवेदन देऊन देखील सदरील नावे एम.आय.एस वरून कमी करण्यात आली नसल्यामुळे त्याचा ग्रामरोजगार सहाय्यक यांना त्रास होत आहे.जर या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही तर आपण आत्मदहन करणार असल्याचा इशारा देखील केशव बारगजे यांनी दिला आहे.

# आदर्श सरपंच दत्तात्रय खोटे यांना राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या शुभहस्ते भूमिपुत्र पुरस्कार प्रदान

आष्टी (प्रतिनिधी)

स्वतःच्या गावाच्या विकासासाठी समर्पित भावनेने काम करणाऱ्या सरपंचांना दैनिक लोकमतच्या वतीने दरवर्षी भूमिपुत्र पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. या पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून योग्य उमेदवारांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये आष्टी तालुक्यातील सांगवी (पाटण) गावचे आदर्श सरपंच दत्तात्रय खोटे यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झाली होती.

शनिवार, दि. २३ ऑगस्ट रोजी झालेल्या एका समारंभात महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे, माजी मंत्री तथा लोकमत मीडियाचे एडिटर - इन - चीफ राजेंद्र दर्डा आणि संपादक नंदकिशोर पाटील यांच्या शुभहस्ते त्यांना हा लोकमत भूमिपुत्र राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.




ग्रामीण भागातील समाजकारण, शिक्षण, कृषी, जलसंधारण, पर्यायवरण, ग्रामविकास इत्यादी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे आणि गावाला विकासाच्या मार्गावर नेण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना या पुरस्काराद्वारे गौरवण्यात आले. पुरस्कार स्वरूपी स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. सरपंच दत्तात्रय खोटे यांना भूमिपुत्र पुरस्कार मिळाल्याबद्दल सांगवी (पाटण) गावात आनंदाचे वातावरण आहे.दैनिक लोकमत चा बीड भूमिपुत्र राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे लोकमतचे आष्टी तालुका प्रतिनिधी तथा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख, पत्रकार अक्षय विधाते, सांगवी पाटण गावचे युवा नेते राजु भोसले, उपसरपंच राहुल खिलारे, ग्रामपंचायत सदस्य दादासाहेब खिलारे,भागवत बोराडे, गणेश खिलारे, आबा वाघमारे, सुनिल भोसले, फौजी संदिप खिलारे, फौजी दत्तात्रय खिलारे, अमोल खिलारे, सद्दाम शेख, अन्सार शेख, फारूख शेख,अमित भोसले, आश्राराजी सुरवसे, रुपेश बेंद्रे, शशिकांत नरवडे, योगेश खिलारे आदींनी अभिनंदन करुन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच आष्टी तालुक्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व साहित्य क्षेत्रातील मान्यवरांकडून व आजी माजी सरपंच, आजी माजी उपसरपंच, आपेष्ट, नातेवाईक व मित्र परिवाराकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. सांगवी पाटण ग्रामस्थ, पत्रकार राजेंद्र लाड व दै. समर्थ राजयोग परिवाराकडून त्यांचे मनस्वी अभिनंदन व भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

# विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याची आदर्श शिक्षकांची भूमिका असावी - मा.आ.भीमराव धोंडे

आष्टी (प्रतिनिधी)

विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे. समाजात उच्च शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी स्वावलंबी जीवन जगत आहेत. समाजात आदर्श शिक्षक निर्माण होणे आवश्यक आहे. शिक्षकांनी आदर्श जीवन जगून विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल बनवावे. विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याची आदर्श शिक्षकांची भूमिका असावी असे आवाहन संस्थाध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले. आष्टी येथील पंडित जवाहलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटनप्रसंगी माजी आ. भीमराव धोंडे बोलत होते.

यावेळी गटशिक्षणाधिकारी सौ. सीमा काळे, केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे, सुरेश काळे, हरिभाऊ जंजीरे, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, राजेंद्र धोंडे, अभय धोंडे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे, सदाशिव दिंडे, हरि बोडखे, संजय सगळे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य सुरेश बोडखे, प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, उपप्राचार्य सुनील भवर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब खेमगर, प्राचार्य डॉ. बनाळे, सागर वाघुले, संदीप नन्नवरे, इंजि. पी. बी. बोडखे, प्रा. हरिष चाऊस, पप्पु गोरे, शंकर धोंडे, शिवाजी टकले, पत्रकार अविशांत कुमकर, अक्षय विधाते, आण्णा साबळे, गणेश पोकळे



आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले की, आजपर्यत पं. नेहरु कनिष्ठ महाविद्यालयातुन १७ हजार विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडलेत. सर्व क्षेत्रात हे विद्यार्थी सफल झालेले आहेत. आपण कृषी (क्राप सायन्स) हा विषय आणला होता म्हणून महाराष्ट्रातील सर्व अध्यापक विद्यालयात (डी. एड.) कालेजात आपल्या विद्यार्थीना प्रवेश मिळाला. ते प्राथमिक शिक्षक झाले. असे हाजारो विद्यार्थी आहेत असे यावेळी भीमराव धोंडे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या वेळी पंडित जवारलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य सुनिल भवर आपल्या प्रास्ताविक भाषणात म्हणाले की, पंडित जवाहलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इतिहासातील सुवर्ण अक्षरांनी लिहिलेला आजचा दिवस आहे. आज खऱ्या अर्थाने आम्हाला हक्काची जागा मिळालेली आहे याचा आम्हाला अभिमान आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पंडित जवाहलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सुरेश बोडखे म्हणाले की, आज पंडित जवाहरलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाची भव्य - दिव्य इमारत पाहून आम्हाला खूप आनंद होत आहे. माजी आ.भीमराव धोंडे यांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून नवीन इमारत बांधून दिल्याबद्दल त्यांनी धोंडे साहेबांचे आभार मानले. सुत्रसंचलन प्रा. झिंजुर्के सर यांनी तर आभार सुरेश फुले यांनी मानले.